गणपती बाप्पा मोरया
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | गुरुवार, ४ सप्टेंबर २०२५ | वर्षः १ | अंकः ९३ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## ओबीसी समाजाच्या मनातील संभ्रम दूर करावा - तटकरे

पुणे , दि. ३ प्रतिनिधी

मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेटिअर लागू करण्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह मराठा आरक्षण उपसमितीने चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मात्र त्याचा तपशील पाहिला तर प्रत्येकाच्या मनात शंका निर्माण असू शकतात. मराठा समाजाच्या मनातील शंका राज्य सरकारने दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. ओबीसींच्या मनातील शंकाही राज्य शासनाने दूर केल्या पाहिजेत, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी येथे व्यक्त केले. शहरातील मानाच्या गणपतींबरोबरच प्रमुख गणेश सार्वजनिक गणपती मंडळांना भेट देऊन दर्शन घेतले. शहराध्यक्ष सुभाष जगताप, कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख यांच्यासह अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

**अग्राग्रलेख**

**खरीखरी**

## आता ओबीसींवर मेहेरबानी

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, काल जरांगे पाटील यांना आपण जिंकलो रे! असे म्हणण्यास भाग पाडले. त्यांचे जिंकणे आणि त्यांचा विजय महोत्सव काल साजरा झाला. आता त्याला अनेक फाटे फुटलेले आहेत. आंदोलकांच्या सर्वच मागण्या कधीही मान्य होत नसतात, सर्व मागण्या मान्य करणे सहज शक्य असते तर आंदोलनाची गरजच पडली नसती. आंदोलन करताना दहा-बारा मागण्या करायच्या असतात त्यापैकी एक दोन महत्त्वाच्या मागण्या असतात. चार-पाच कमी महत्त्वाच्या मागण्या असतात आणि काही अशाच मागण्या असतात. त्यापैकी काही मान्य करून झाल्यावर आंदोलन मागे घ्यायचे असा सर्वसाधारण शिरस्ता आहे. मुंबई मधील मिल कामगारांचे नेते दत्ता सामंत यांनी कामगारांचे भले करण्याकरता त्या काळी म्हणजे ८० ते ९० च्या दशकामध्ये ताठरपणा दाखवल्यावर गिरणगावातील अनेक मिल कामगार उध्वस्त झाले. कित्येक जण अक्षरशा संसारातून उठले आणि कित्येक संसार रस्त्यावर आले कारण, वेळेवर तडजोड न केल्याने होत्याचे नव्हते झाले याचा अनुभव आपण मागील इतिहासात पाहिलाच आहे. जरांगे पाटील यांनी या आंदोलनावेळी हैदराबादची महत्त्वाची मागणी मान्य करून घेतली. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे मान्य करून घेतले. मृत आंदोलकांच्या परिवाराला सरकारी नोकरी देण्याचेही मान्य करून घेतले आणि विशेष म्हणजे जे काही तुम्ही आम्हाला आज देत आहात. ते सरकारने कोर्टामध्ये पण टिकवले पाहिजे हा सुद्धा मुद्दा मान्य करून घेतलेला आहे. आणखी इतरही काही मागण्या मंजूर करून घेतल्या आहेत, यामध्ये बऱ्याच अंशी आंदोलनकर्त्यांचे बऱ्यापैकी समाधान झाले. तिकडे या आरक्षणामुळे ओबीसी समाजाला नुकसान होईल अशी चर्चा सुरू झाल्याबरोबर ओबीसींना सुखावण्यासाठी आज सरकारने ओबीसींच्या प्रश्नासाठी ओबीसी असलेल्या आमदारांची आणि मंत्री महोदयांची उपसमिती गठित केलेली आहे. ओबीसी समाजात मराठ्यांना आरक्षण दिले तर आपल्या हक्काचे रक्षण होईल की नाही हा त्यांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आणि लाखमोलाचा आहे. सरकार एका समाजाला न्याय देण्यासाठी दुसऱ्या समाजावर अन्याय करणार नाही हे सरकारला दाखवून देणे गरजेचे होते. देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा सुज्ञ आणि सुविद्य असलेल्या मुख्यमंत्र्यांना ही बाब तात्काळ समजली असावी त्यामुळेच हे सरकार सर्वांचेच आहे हे दाखवणे गरजेचे होते. कालपासून ओबीसी नेत्यांकडून बऱ्याच शंकाकुशंका व्यक्त करण्यात आल्या होत्या त्याला उत्तर म्हणून आजच्या ओबीसी उपसमितीकडे बघावे लागेल. आमच्या माहितीप्रमाणे मराठवाड्यातील अनेक मराठा कुणबी म्हणून ओबीसी बांधवांबरोबर आरक्षणाचा लाभ घेतच आहेत. आताही कालच्या निर्णयानंतर सरकारने अत्यंत कौशल्याने 'सरसकट' हा शब्द वापरलेला नाही. जरांगे पाटलांनाही हे सर्व मान्य आहे असे दिसते. आता आरक्षणाबाबत ओबीसी समाजात सध्या ज्या शंका उपस्थित झालेल्या आहेत त्याचे निराकरण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. असा आणि हाच संदेश नव्याने गठित केलेल्या ओबीसींच्या उपसमितीला सर्वांना द्यावयाचा आहे. सरकारला सरकार सारखेच वागायचे असते आणि गंमत अशी आहे की आपले महाराष्ट्राचे सरकार सरकार सारखेच वागलेले आहे. त्यामुळेच एखाद्याला काही मिळाले तर दुसऱ्याने बिथरून जाऊ नये. म्हणून आजची मात्रा तंतोतंत दुरुस्ती करणारी ठरेल, एवढे मात्र निश्चित आहे.**

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# आता ओबीसींनाही उपसमिती

मुंबई , दि. ३ प्रतिनिधी

राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीवर सुवर्णमध्य साधला असून उपोषकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. त्यामुळे, गेल्या ५ दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आरक्षण आंदोलनाचा विजय झाल्याचं बोललं जात आहे. शासनाने मागण्या मान्य केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा बांधवांनी गुलालाची उधळण करत एकच जल्लोष केला. मात्र, या शासन निर्णयाने ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करत ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. विशेष म्हणजे ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकीलाही दांडी मारली होती. त्यानंतर, आज राज्य शासनाने ओबीसी समाजासाठीही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याची भूमिका घेत छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार घातल्याचे वृत्त आहे. भुजबळांच्या नाराजी नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांची तातडीची बैठक होत असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महत्वाच्या नेत्यांची देवगिरी या सरकारी निवासस्थानी बैठक होत



आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल बैठकीला उपस्थित राहणार आहेत. तर, महायुतीत मंत्री भुजबळ यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर संभाव्य अडचणी लक्षात घेत बैठक होतं असल्याची सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, मंत्री भुजबळ यांनी पक्षाच्या प्री कॅबिनेट बैठकीत ओबीसी आरक्षणप्रश्नी होतं असलेल्या अन्यायाबाबत उघड भूमिका घेतल्यानंतर वरिष्ठ नेत्यांच्या पार पडणाऱ्या बैठकीला विशेष महत्व आहे.

**ओबीसीसाठी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक**

ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत केली जाणार असून आजच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये हा महत्त्वाचा निर्णय झाल्याचे समजते. मराठा आरक्षण संदर्भात शासन निर्णय काढल्यानंतर ओबीसी समाज आक्रमक झाल्यामुळे शासनाने ओबीसी समाजाची भूमिका लक्षात घेत पाऊले उचलली आहेत. आक्रमक ओबीसी समाजाला शांत करण्यासाठी शासनाकडून मोठा निर्णय घेण्यात येत आहे. ओबीसी समाजासाठी देखील ६ सदस्यीय मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात येत आहे. त्यासाठी, प्रत्येक पक्षातील दोन सदस्यांची नेमणूक करण्यात येईल. ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती आजच गठीत होणार असून आजच जीआर देखील काढला जाणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

**हैदराबाद गॅझेटच्या जीआरची होळी**

मराठा आरक्षणासंदर्भात शासनाने काढलेल्या जीआर विरोधात जालन्यात ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआर जालन्यात ओबीसी बांधवांनी फाडून पायदळी तुडवला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य करत काल राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला आहे. ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची घुसखोरी होत असल्याचा आरोप ओबीसी समाजाकडून केला जात आहे. जीआर रद्द झाला न झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे म्हणत भोकर येथे आंदोलक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. हैदराबाद गॅझेटचा जीआर काढल्यानंतर आज भोकर येथे तहसील कार्यालय समोर ओबीसी आंदोलकांनी जीआरची होळी केली.

### समितीत कोण मंत्री?

**या समितीचे अध्यक्षपद हे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे असणार आहे. तर या समितीत भाजपचे चार, राष्ट्रवादीचे दोन आणि शिवसेनेचे दोन मंत्री असणार आहेत. यामध्ये छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील अशी माहिती सूत्रांनी दिली.**

## मी मराठा आरक्षण रद्द कण्यासाठी कोर्टात जाणार- सदावर्ते

मुंबई , दि. ३ प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानातील आंदोलनाची सांगता झाली असून राज्य शासनाने मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार, सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा शासन आदेश जारी केला असून सातारा गॅझेटियरचा शासन आदेश देखील निघणार आहे. त्यामुळे, मराठा आंदोलकांनी गुलाल उधळत जल्लोष केला. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील शासनाच्या या निर्णयाचे स्वाद करत मराठा समाज बांधवांसाठी आजचा दिवस आनंदाचा असल्याचं म्हटले. मात्र, आता या शासन निर्णयावरुन आता ओबीसी समाज आक्रमक झाला असून ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही हा शासन आदेश संविधानाला धरुन नसल्याचे म्हटले. तसेच, शासनाने मनोज जरांगे पाटील यांना आईस गोळा दिल्याचं म्हटलं आहे.

मराठा आरक्षणसंदर्भात शासनाने काढलेल्या शासन निर्णयाविरुद्ध आपण राधाकृष्ण विखे पाटील आणि उपसमितीला



कोर्टात बोलवा म्हणणार आहोत. एकदा आरक्षण दिले, तरी पुन्हा आरक्षण दिले हे कोणत्या आधारे? मग १० टक्के आरक्षण रद्द करणार आहात का? त्याची विनंती मी १३ तारखेला न्यायालयात करणार आहे, असेही गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटलं. तसेच, आईस गोळा देऊन म्हणजेच कुल्फी देऊन सरकारने मनोज जरांगे यांना पाठवलं आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री काल तिथे आंदोलनस्थळी नव्हते, मग मागासवर्गीय मंत्री फक्त नामधारी असतात का? महिलामंत्र्यांना आंदोलन स्थळी नेण्यात नाही आले, हे राधाकृष्ण विखे पाटील यांनी का केलं नाही? असा सवालही सदावर्तेंनी उपस्थित केला आहे.

सरकारला संभ्रम अवस्था निर्माण करायची, आमदार-खासदार मराठा समाजाचे आहेत, मराठवाड्यातले आहेत, ते चॉकलेट वाटण्यासारखे प्रमाणपत्र देतील. पण, मराठा बांधव मागासलेले नाहीत, वडारी दगड फोडतो, त्याला मागासलेपण म्हणतात. मंदिरातल्या चाव्या ब्राह्मणांकडे नाही तर मराठ्यांकडे आहेत. जरांगे यांना गावाकडे धाडण्यासाठी शासन निर्णयाचं चॉकलेट दिले, असेही सदावर्तेंनी म्हटलं. दरम्यान, जरांगे पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी आमची मागणी आहे, मुंबईत सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे, ते त्यांच्या खिशातून भरून द्यावे, अशीही मागणी सदावर्ते यांनी केली आहे.

## सरकारच्या जीआरवर प्रश्नचिन्ह
## माजी न्यायाधीशांचा थेट आक्षेप

मुंबई , दि. ३ प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या पाच दिवसांच्या उपोषणानंतर सरकारने हैद्राबाद गॅझेट लागू करण्यासाठी जीआर काढला. मराठा आंदोलनकर्त्यांनी याचा आनंदोत्सव साजरा केला, पण माजी न्यायाधीश बी.जी. कोळसे-पाटील यांचा दृष्टिकोन अत्यंत गंभीर आहे.



कोळसे-पाटील म्हणाले की, "हे आरक्षण कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाही. जीआर पाहून मी स्वतः हतबल झालो." त्यांनी जरांगे पाटीलांना फोन करूनही चेतावणी दिली होती की, या निर्णयातून मराठ्यांचे आणि त्यांच्या हक्कांचे नुकसान होऊ शकते.

माजी न्यायाधीश म्हणाले की, या जीआरचा संपूर्ण अंमलबजावणीचा मजकूर पाहिला तर तलाठ्यापासून ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहायक अधिकारी यांच्याकडे जावे लागेल, आणि शेवटी कोर्टातील प्रक्रिया टाळता येणार नाही. "जर कायदेशीर आरक्षण द्यायचे असेल, तर ते केंद्र आणि राज्य सरकार मिळूनच करावे लागेल," असे त्यांनी स्पष्ट केले.

कोळसे-पाटील यांनी उपोषणातून मिळालेल्या वचनांची खरी किंमत कायदेशीर चौकटीत तपासून ठरवण्याचे आव्हान दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार, "मी १९७६ पासून मरण, पोलिस आणि तुरुंग यांना न घाबरत, १०० टक्के सत्य बोलून टिकेचा धनी व्हायला तयार आहे. डोंगर पोखरून उंदीर बाहेर काढणे म्हणजे काय हे आता मला समजले."

यामुळे मराठा आरक्षणाच्या भवितव्यासाठी सामाजिक आणि राजकीय चर्चेला नवीन तडा लागला आहे. आंदोलनातील आनंदोत्सव आणि मिळालेल्या जीआरच्या प्रभावाची खरी प्रत्यक्षता आता न्यायालयीन कसोटीवर पडणार आहे.

## नुकसान भरपाईचे काय ? उच्च न्यायालयाची जरांगे पाटील आणि आयोजकांना विचारणा

मुंबई , दि. ३ प्रतिनिधी

मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची मागणी राज्य सरकारने मान्य केली. त्यानंतर, जरांगे यांनी पाच दिवसांपासून आझाद मैदानात केलेले आमरण उपोषण सोडले आणि आंदोलनही संपले. हे सगळे असले तरी पाच दिवसांच्या आंदोलनदरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेच्या झालेल्या नुकसान भरपाईचे काय ? अशी विचारणा करून त्याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.

जरांगे यांनी चिथावणी दिल्याने मोठ्या प्रमाणात आंदोलक मुंबईत दाखल झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे, याबाबतही जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने नमूद केले. त्यावर जरांगे यांनी अशा प्रकारची कोणतीही भाषणे केलेली नाहीत. किंबहुना, आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून ते



उपोषणाला बसले होते, असा दावा करून जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी आरोपांचे खंडन केले. त्याची दखल घेऊन तोंडी माहिती देऊ नका, तर प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करा, असे आदेश न्यायालयाने दिले.

तसेच, विषय मार्गी लागला असल्याने याचिका प्रलंबित ठेवण्यात अर्थ नाही. परंतु, आम्हाला काहीही तोंडी नको आहे. त्यामुळे, जरागे आणि आदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्रावर बाजू मांडावी. त्यानंतर याचिका निकाली काढली जाईल, असे स्पष्ट करून न्यायालयाने हे प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी जरांगे आणि आयोकांना चार आठवड्यांची मुदत दिली.

तत्पूर्वी, आंदोलन सरकारच्या मध्यस्थीने संपल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली असता आंदोलन काळात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई कोणाकडून वसूल करणार, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. त्यावर, पोलिसांनी या प्रकरणी काही गुन्हे दाखल केले आहेत. त्यामुळे, त्याद्वारे भरपाईचा मुद्दा निकाली लावला जाईल, असे आंदोलनाच्या आयोजकांतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

तर, आंदोलकांनी रस्ते, पदपथ, बस व रेल्वे स्थानके अडवण्यापलिकडे काहीही नुकसान केलेले नाही, असे जरांगे यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. त्यावर, न्यायालयाने काही छायाचित्रे दाखवत यात नुकसान झाल्याचे दिसत असल्याचे म्हटले. तसेच, समन्वयाचा अभाव किंवा अन्य कारणामुळे हे सगळे घडले असावे. परंतु, नुकसान झाल्याचे छायाचित्रांतून दिसत आहे याचा पुनरूच्चार न्यायालयाने केला. तेव्हा आंदोलकांनी सार्वजनिक मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान केले नसल्याचे जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी पुन्हा एकदा न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

## अरुण गवळीची नागपूर तुरुंगातून 18 वर्षांनी सुटका

नागपूर, दि. ३ प्रतिनिधी

अंडरवर्ड डॉन अरुण गवळीची नागपूर मध्यवर्ती कारागृहातून सुटका झाली आहे. मागच्या गेटने पोलिसांनी मीडियापासून लपवत अरुण गवळी यांची सुटका केली आहे. अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीची १८ वर्षांनंतर नागपूर तुरुंगातून सुटका झाली आहे, सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर केल्यानंतर आज त्यांची सुटका झाली आहे. अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीला सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अरुण गवळीला मुंबई शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी नागपूर मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत होता. सर्वोच्च न्यायालयाने अरुण गवळीला जामीन मंजूर केला असून थोड्या वेळात नागपूर मध्यवर्ती कारागृहातुन सुटका झाली.

कुख्यात गॅंगस्टर अरुण गवळी जामिनावर नागपूरच्या मध्यवर्ती तुरुगातून बाहेर आला



आहे. नागपूर पोलिसांनी सुरक्षा व्यवस्थेत अरुण गवळी याला नागपूरच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर विमानतळ पर्यंत आणले. आता अरुण गवळी विमानाने मुंबईच्या दिशेने रवाना होईल. मुंबईत २००७ मध्ये शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला कुख्यात गुंड डॅडी उर्फ अरुण गवळी याला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी जामीन मंजूर केला होता. नागपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगणारा गवळी मागील १८ वर्षांपासून जामिनासाठी प्रयत्न करत होता. जामसांडेकर यांची घाटकोपर येथे त्यांच्या निवासस्थानी भरदिवसा हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात १८ वर्षांनंतर अरुण गवळी याला जामीन मंजूर करण्यात आल्याने त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला आहे.


जामसांडेकर यांची घाटकोपर येथे त्यांच्या निवासस्थानी भरदिवसा हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात १८ वर्षांनंतर अरुण गवळी याला जामीन मंजूर करण्यात आल्याने त्याच्या सुटकेचा मार्ग मोकळा झालेला आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला असला तरी त्यासंदर्भातील अटी-शर्ती सत्र न्यायालय निश्चित करेल असे स्पष्ट केले होते. त्यामुळे मुंबई सत्र न्यायालयातून अटी-शर्ती निश्चित झाल्यावर जामिनासंदर्भात ऑर्डर जारी झाली. त्याची प्रत नागपूर मध्यवर्ती कारागृहात आल्यानंतर आज अरूण गवळीची सुटका करण्यात आली आहे.

## पुण्यात मानाच्या गणपती मिरवणुकीचे वेळापत्रक

पुणे, दि. ३ प्रतिनिधी

देशभरात यंदा गणपती मिरवणूकांचा जल्लोष पहायला मिळणार असून ६ सप्टेंबर रोजी शनिवारी गावोगावी आणि घरोघरी बाप्पाला वाजत गाजत निरोप दिला जाईल .पुण्याच्या पारंपरिक गणपती विसर्जनासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. मानाच्या पाच गणपती बाप्पासह इतर गणेश मंडळांसाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे . पुण्यात विसर्जनादिवशी होणाऱ्या गर्दीच्या पाश्वभूमीवर यंदा विसर्जनाच्या वेळा प्रशासनानं ठरवून दिल्या आहेत . पुण्यातील गणेशोत्सवाचा उत्कर्षबिंदू असलेली विसर्जन मिरवणूक यंदा ठरावीक वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. पोलिस प्रशासन आणि गणेश मंडळांना नियमावली कळवण्यात आली असून यंदा शिस्तबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने मिरवणूक पार पडावी यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली आहे.

पुण्यातील मानाच्या गणपतींच्या



विसर्जन मिरवणुकीसंदर्भात यंदाचे वेळापत्रक आणि मार्ग जाहीर करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी याची माहिती देत मिरवणूक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि वेळेत पार पडावी यासाठी नियमावली लागू केली असल्याचे सांगितले. शहरातील नागरिक आणि गणेश मंडळांना या नियमानुसारच सहभागी व्हावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पुण्याचा पहिला मानाचा कसबा गणपती सकाळी ९.१५ वाजता मंडईतील टिळक पुतळा येथे पोहोचेल. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता मिरवणुकीची सुरुवात होईल. कसबा गणपती सकाळी ९.३० वाजता बेलबाग चौकात दाखल होऊन १०.१५ वाजता लक्ष्मी रोडकडे मार्गस्थ होईल. दुसरा मानाचा तांबडी जोगेश्वरी गणपती सकाळी १०.३० वाजता बेलबाग चौकातून लक्ष्मी रोडकडे जाईल. सहावा मानाचा महापालिका गणपती आणि सातवा त्वेष्ट कासार गणपती दुपारी १ वाजता मिरवणुकीत सामील होतील.

लक्ष्मी रोड आणि शिवाजी रोडवरील मंडळे दुपारी ३.४५ वाजता मुख्य मिरवणुकीत सामील होतील. श्रीमंत दगडूशेठ गणपती दुपारी ४ वाजता, तर जिलब्या मारुती आणि अखिल मंडई गणपती मंडळ संध्याकाळी ५.३० नंतर मिरवणुकीत सहभागी होतील. प्रशासनाच्या नियोजनानुसार संध्याकाळी ७ वाजेपर्यंत बेलबाग चौक रिकामा करण्यात येणार आहे.

## आंदोलन काळातील राजकीय गुन्हे मागे घेणार - एकनाथ शिंदे

मुंबई, दि. ३ प्रतिनिधी

मुंबईतील मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनप्रकरणी नऊ गुन्हे दाखल झाले आहेत. मुंबईतील झोन एकच्या हद्दीतील वेगवेगळया पोलीस ठाण्यांमध्ये मराठा आंदोलकांविरोधात नऊ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी आझाद मैदान पोलीस ठाण्यात तीन, मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात दोन, जे. जे. मार्ग, कुलाबा, एमआरए मार्ग व डोंगरी पोलीस ठाण्यात प्रत्येकी एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. बेकायदेशीर कृत्य करणे, रस्ता अडवणे यासह वेगवेगळ्या कारणांसाठी अज्ञात आंदोलकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, आंदोलन काळातील राजकीय गुन्हे मागे घेणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

गेल्या पाच दिवसांमध्ये मराठा आरक्षणासाठी मुंबईत करण्यात आलेल्या आंदोलनामुळे निर्माण झालेला अडथळा आणि रस्ता रोकोसह सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा आणल्याच्या आरोपांवरून मुंबई पोलिसांनी तब्बल नऊ गुन्हे दाखल केले आहेत. हे



सर्व गुन्हे सोमवारी (१ सप्टेंबर) नोंदवण्यात आले असून, अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. मात्र, आता हे गुन्हे मागे घेतले जातील, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. ते काही वेळापूर्वी एबीपी माझाशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी सांगितलं की "आम्ही आंदोलन काळातील सर्व राजकीय गुन्हे मागे घेणार आहोत." दरम्यान, दाखल गुन्ह्यांबाबत पोलिसांनी सांगितलं की "हे गुन्हे बेकायदेशीर जमाव जमवणे आणि रस्ता रोकोसारख्या कलमांखाली नोंदवण्यात आले आहेत." आंदोलकांनी जबरदस्तीने क्रिकेट क्लब ऑफ इंडिया परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचेही अधिकाऱ्याने सांगितले. जे नऊ गुन्हे दाखल झाले आहेत त्या प्रकरणांमध्ये सहभागी आरोपींची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र संबंधित कलमांमध्ये सात वर्षांपेक्षा कमी शिक्षा असल्याने अद्याप अटक करण्यात आलेली नाही, असंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

## शासन निर्णय फाडणे, होळी करणे थांबवा- छगन भुजबळ

मुंबई, दि. ३ प्रतिनिधी

कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या जीआरवर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. अनेक ठिकाणी या शासन निर्णयाची होळी करण्यात आली. आता याबाबत मंत्री छगन भुजबळ यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे.

मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, मराठा आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासनाने एक जीआर जाहीर केला आहे. या शासन निर्णयात काही वाक्ये, शब्द याबद्दल संभ्रम आहे. याचे वेगवेगळे अर्थ लावून ओबीसी आणि मागासवर्गातील अनेक संघटना, नेते यांनी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले, काही ठिकाणी मोर्चे काढले जातायेत. काही ठिकाणी शासन निर्णय फाडले जातायेत. मी इतर ओबीसी नेत्यांशी चर्चा करत आहे. सध्या राज्यात गणेशोत्सव सुरू आहे. अनेकांच्या घरी गणपती असतात, कार्यकर्ते गणेशोत्सवात आहेत. ओबीसी कार्यकर्त्यांची उपोषणे सुरू आहेत, मात्र तूर्तास ती थांबवावीत असं त्यांनी सांगितले. तसेच आम्ही अनेक कायदेतज्ज्ञ, वकील यांना ही कागदपत्रे देऊन याबाबत जो काही संभ्रम आहे त्याबद्दल त्यांची मते जाणून घेत आहोत. आवश्यक असल्यास निश्चितपणे त्यांच्याशी चर्चा करून कदाचित सोमवारी, मंगळवारपर्यंत हायकोर्टात जाण्याची आमची तयारी आहे. त्याबाबत अनेक कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागत आहे. आम्ही सगळे विविध कायदेतज्ज्ञांशी चर्चा करत आहोत अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली. दरम्यान, सर्व नेत्यांसोबत चर्चा केल्यानंतर माझी सर्वांना विनंती आहे, उपोषण, मोर्चा काढणे, शासन निर्णयाची होळी करणे हे प्रकार तूर्तास थांबवावेत. आम्ही या गोष्टीचा अभ्यास करून योग्य तो निर्णय घेणार आहोत. ओबीसींचे नुकसान होत असेल असं वकिलांनी निश्चितपणे सांगितल्यानंतर हायकोर्ट असेल वा सुप्रीम कोर्ट आमची जाण्याची तयारी आहे.

# विविध मागण्यांसाठी २३ सप्टेंबर रोजी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा एल्गार आंदोलनाचा इशारा

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघासह अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाने शासनास आंदोलनाची पूर्वसूचना दिली असून, २३ सप्टेंबर २०२५ रोजी राज्य व देशव्यापी धरणे आंदोलन छेडले जाणार आहे.

९ जुलै २०२५ रोजी झालेल्या धरणे आंदोलनानंतरही केंद्र व राज्य शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने ही लढाई उग्र होणार असल्याचा इशारा महासंघाने दिला आहे. १६ व १७ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे झालेल्या महासंघाच्या बैठकीत तीव्र असंतोष व्यक्त करून, २३ सप्टेंबर रोजी एल्गार आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांच्या मार्फत पंतप्रधान, मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच प्रधान सचिव ग्रामविकास व पंचायत राज यांना आंदोलनाची नोटीस देण्यात आली. या वेळी जिल्हा महासंघाचे अध्यक्ष अरुण आहेर, कार्याध्यक्ष डॉ. भगवान पाटील, सरचिटणीस विक्रम पिंगळे यांच्यासह प्रमोद निरगुडे, महेंद्र पवार, यासीन सैय्यद, सागर गांगोडे, किशोर अहिरे, यतिन पगार, स्वाती बेंडकोळी, स्वाती महाजन, डॉ. निकम आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**प्रमुख मागण्या :** * आठवा वेतन आयोग समिती गठीत करणे. * पीएफआरडीए कायदा रद्द करून सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंमलात आणणे. * कामगार कायदे संहिता रद्द करणे. * १० वर्षे सतत कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी / रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करणे. * सर्व कर्मचाऱ्यांना व निवृत्तीधारकांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे. * प्रतिक्षा यादीवरील सर्व उमेदवारांना विनाअट अनुकंपा नियुक्त्या देणे. * चालक व चतुर्थ श्रेणी भरतीवरील निर्बंध हटवणे. * लिपिक-लेखा कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीतील टप्पे कमी करणे. * नवीन योजना लक्षात घेऊन सुधारित आकृतीबंध मंजूर करणे. * कर्तव्य बजावताना होणाऱ्या हल्ल्यांवर कठोर कारवाई करून IPC ३५३ कलमात दुरुस्ती करणे. * सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरणे. * उद्योगांचे खाजगीकरण व विभागांचे संकोचीकरण थांबवणे.* राष्ट्रीय शिक्षण धोरणांचा पुनर्विचार करणे.

शासनाने तातडीने चर्चेची तारीख व वेळ ठरवून ठोस भूमिका घेतली नाही, तर २३ सप्टेंबर रोजी कर्मचारी, शिक्षक व कर्मचारीवर्ग रस्त्यावर उतरून जोरदार धरणे आंदोलन करतील असा इशारा महासंघाने दिला आहे.

## सुरगाणा तालुक्यातील गोगुळ-रोकडपाडा रस्त्याची दयनीय अवस्था; ग्रामस्थांचा संताप





**पेठ ।** सुरगाणा तालुक्यातील गोगुळ ते रोकडपाडा या रस्त्याची अवस्था गेल्या पंधरा-सोळा वर्षांपासून अत्यंत बिकट असून आजही तीच परिस्थिती कायम आहे. रस्त्यावर सर्वत्र खड्डे, चिखल व वाहून गेलेली माती यामुळे नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांपासून ते अत्यवस्थ रुग्णांपर्यंत सर्वांनाच जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. ग्रामस्थांनी वारंवार निवेदने, तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी वर्गणी जमा करून व श्रमदानातून रस्ता दुरुस्तीला सुरुवात केली. दगड-खडी टाकून तात्पुरता रस्ता रहदारीस खुला करण्यात आला. या बिकट रस्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेणे अशक्य झाले असून खते व बियाण्यांचा पुरवठा करण्यातही मोठा अडथळा निर्माण झाला आहे. मालवाहतूक करणारे वाहनधारक त्रस्त झाले आहेत. परिणामी शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासन दरवर्षी निधी उपलब्ध करूनही संबंधित विभाग कुचकामी ठरतोय. लोकप्रतिनिधींकडे अनेकदा धाव घेतली तरी ठोस उपाययोजना न झाल्याने ग्रामस्थांना स्वतःच श्रमदान करून रस्ता दुरुस्ती करावी लागत असल्याची खंत वाटत असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली आहे. शासनाचा निधी नेमका कुठे खर्च होतोय? आम्हालाच श्रमदान करून रस्ता करावा लागत असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाची गरज काय असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

## खरशेत ग्रामपंचायतमध्ये जलजीवन मिशनमध्ये गैरप्रकार; ग्रामस्थांकडून चौकशीची मागणी



**हरसूल ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील खरशेत ग्रामपंचायत हद्दीतील जलजीवन मिशनच्या कामांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ग्रामस्थांनी थेट जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांना निवेदन सादर करून या कामांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, खरशेतसह सहा पाड्यांसाठी जलजीवन मिशन योजनेला मंजुरी मिळूनही कामे मार्गी लागलेली नाहीत. सावरपाडा आणि मुरुमहट्टी येथे ही योजना अद्याप अपूर्ण अवस्थेत पडून आहे. परिणामी आजही ग्रामस्थांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळालेले नाही. विशेष म्हणजे, महिलांना अजूनही डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणण्याची वेळ येत आहे. ग्रामस्थांनी जाहीर इशारा दिला आहे की, कोट्यवधींचा निधी उपलब्ध असूनही



कामे रखडवली जात असतील तर हा थेट भ्रष्टाचार आणि बेपर्वाईचा प्रकार आहे. शासनाने तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई केली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

निवेदनावर रघुनाथ गांगोडे, तुकाराम काकड, भाऊराम राऊत, रामचंद्र राऊत, रवी राऊत, दशरथ राऊत, महादू भोबे, पंढरीनाथ राऊत, चिमण गोतरणे, धोंडू दळवी आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## केटीएचएम महाविद्यालयात आरोग्य, सुरक्षाविषयक मार्गदर्शन

**नाशिक ।** केटीएचएम महाविद्यालयात विशाखा समीती अंतर्गत आहार व योग तसेच महीला सक्षमीकरण व पोलिस सुरक्षा या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विशाखा समिती अंतर्गत घेण्यात आलेल्या मार्गदर्शनपर व्याख्यानसाठी प्रमुख अतिथि व वक्ते म्हणून आम्रपाली तायडे, पोलिस निरीक्षक महीला सुरक्षा विभाग पोलिस आयुक्तालय नाशिक ह्या उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थीनींना महीला सक्षमीकरण व पोलिस सुरक्षा याबद्दल मार्गदर्शन केले. सुरक्षेविषयीचे कायदे समजावून सांगितले. पॉस्को तसेच बलात्कार व विनयभंग विषयीचे ज्ञान विद्यार्थीनिंना दिले. स्वताच स्वताचे पोलिस बनून सुरक्षा करावी, मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळावा, त्यानंतर मीनल शिंपी यांनी आहार व आरोग्य ह्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी संतुलित आहार तसेच त्यात मिनरल्स व विटामीन ई सी चे महत्व, केसांचे



आरोग्य आहारावर कसे अवलंबून आहे व प्रथिनांची शरिरासाठी असणारी आवश्यकता तसेच मेडिटेशन योगा व सूर्यनमस्कार ह्यांचे दैनंदिन जीवनातील महत्व प्रात्यक्षिकासह सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. के. एच. अहिरे होत्या. आपल्या मनोगतातून विद्यार्थीनींना विशाखा समिती स्थापन होण्याची पार्श्वभूमी सांगितली व स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे हे समजावून सांगितले. संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे ह्यांनी ही विद्यार्थीनींना स्वताचे संरक्षण करण्याचे तसेच महीला सबलिकरण व सक्षमीकरण तसेच योग चौरस आहार याबद्दल मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विशाखा समिति सचिव प्रा. वंदना रकीबे ह्यांनी केले. सूत्रसंचालन विशाखा समिति प्रमुख प्रा. वैशाली कोकाटे ह्यांनी केले. परिचय प्रा. जयश्री कुशारे, प्रा. अर्चना मगर ह्यांनी केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. आशा दवंगे, प्रा. प्रविण ठोंबरे, प्रा. सोनाली ठाकरे ह्यांनी प्रयत्न केले. प्रा. गीते, गडाख, रत्ना पाटील मुळाने, पाटील, विभागप्रमुख डी. बी. गावले, आर. एस. पवार, किरण रेडगावकर व मोठ्या संख्येत विद्यार्थिनींनी उपस्थिती दर्शविली. आभार स्मिता पिंगळे यांनी मानले.

## देवळाली कॅम्प येथे जेष्ठ नागरिक संघ खुले वाचनालयाचे उद्घाटन

**देवळाली कॅम्प ।** येथील शिवयुवा प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव वतीने जेष्ठ नागरिक संघ स्थापना व जेष्ठांसाठी खुले वाचनालयाचे नुकतेच देवळाली कॅम्प येथे उद्घाटन करण्यात आले याचे उद्घाटन जेष्ठ नागरिक भिकाजी डांगे यांच्या हस्ते करण्यांत आले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाला बसण्यांसाठी बाकडे व रोज दैनंदिन पेपर उपलब्ध करून देण्यांत आले. यावेळी शिवयुवा प्रतिष्ठान अध्यक्ष प्रमोद मोजाड यांनी प्रास्ताविक करतांना सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, उतारवयातील अडचणी, ज्येष्ठांकडून समाजासाठी अपेक्षित योगदान याची चर्चा व्हावीत यासाठी खुले जेष्ठांसाठी खुले वाचनालय सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्रमोद मोजाड यांनी सांगितले.





यावेळी मनसे उपजिल्हाप्रमुख खंडेराव मेढे यांनी समाजाने ज्येष्ठांना अडगळ न समजता त्यांच्यात असलेल्या सकारात्मक ऊर्जेचा अधिकाधिक वापर करून घेण्याची गरज असल्याचे मेढे यांनी सांगितले यावेळी जेष्ठ नागरिक भिकाजी डांगे यांनी आभार व्यक्त करत ज्येष्ठांना कुटुंबात एक दर्जा असतो. मात्र याच काळात अनेक प्रश्नही निर्माण होतात. ज्येष्ठांकडून तरूणांनी अनुभवाचे बोल घेण्याची गरज असल्याचे डांगे यांनी सांगितले. यावेळी तालुकासंघटक साहेबराव चौधरी, आर.पी.आयचे शहराध्यक्ष रविंद्र गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या .यावेळी भिकाजी डांगे, बाळासाहेब बेरड, वस्ताद रूंजा काळे,रघुनाथ मोंढे, अशोक पवार, बाळासाहेब बेरड,शंकर भावले, काथिनाथ मोजाड,अशोक वावरे, विजय गायकवाड,बाळासाहेब गावंडे, सचिन भालेराव,बाळासाहेब गायकर आदींसह जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

## भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**येवला ।** श्री गुरुदेव शिक्षण मंडळ अध्यक्ष डॉ. पहिलवान, शिक्षक गायकवाड यांच्यावर कारवाई करावी, या मागणीसाठी अखिल भर्तीयव्हीभ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्यावतीने जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, येवला तालुक्यातील श्रीगुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत येवला येथील शासन मान्यताप्राप्त अनुदानित येवला स्वामी मुक्तानंद विद्यालयात सेमीच्या इयत्ता पाचवी, सहावी, सातवी या वर्गावर तेजस गायकवाड हे शिक्षक शिकवण्यासाठी येत नसून विद्यालयात फक्त हजेरी लावण्यासाठी येतात. इतर वेळी ते खजिनदार म्हणून संस्थेच्या कामाचे निमित्त दाखवून बाहेरच असतात. ते शिकवण्यासाठी येत नाही. संस्थेच्या कामानिमित्त ते बाहेर असतील, असे श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.अमृतसा सारंगधरसा पहिलवान यांनी



विद्यालयाच्या वरिष्ठांना लेखी पत्र व्यवहारात म्हटले आहे. गायकवाड शिकवण्यासाठी येत नसल्यामुळे, मुलांचे शैक्षणिक नुकसान तर होत आहे; पण शासनाचा फुकट पगार घेऊन सरकारला गंडा घातला जात आहे.

म्हणून अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली निवड समिती अध्यक्ष अनिल देसले यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. हे शिक्षक पगार शासनाचा घेता अन काम संस्थेचे करतात. पगार मुलांना शिकवण्याचा घेता तर मुलांना शिकवत का नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. संस्थेकडे ईतर कामासाठी पगारी कर्मचारी असताना अशा मनमानी, अनागोंदी कारभार करणाऱ्या या दोषींची चौकशी करून शासनाच्या शैक्षणिक विभागात घोटाळे करणाऱ्या श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.अमृतसा सारंगधरसा पहिलवान यांना पदावरून दूर हटवावे व संस्थेची मान्यतः रद्द करण्यात यावी. अन्यथा संघटनेच्या माध्यमातून नाशिक जिल्हा परिषदेसमोर दि.२३ सप्टेंबर रोजी संघटनेचे पदाधिकारी व येवला तालुक्यातील ग्रामस्त व पालक यांच्यावतीने उपोषण करण्यात येणार आहे, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेचे निवड समिती अध्यक्ष अनिल देसले, राष्ट्रीय समन्वयक हितेश दाभाडे, प्रदेश अध्यक्ष सुनील जाधव, प्रदेश युवती अध्यक्षा सना शेख, प्रदेश प्रवक्ते मच्छिंद्र मगर, प्रदेश सरचिटणीस विजय देवरे, विभागीय अध्यक्ष दीपक नन्नावरे, संपर्क प्रमुख संजय गवारे, नाशिक शहर जिल्हाध्यक्ष दीपक मंडलिक, महिला जिल्हाध्यक्ष कुंदा पवार, बाबासाहेब बोँबले, जिल्हा सचिव दिनेश झुटे, उपजिल्हाध्यक्ष सुनील येशवंते, विजय गांगुर्डे, कृष्णा शिंदे, दत्तू शिंदें, नितीन ठाकरे, मोना गवळी, रफिक शेख, विशाल साळवे, निलेश खरे, रेखा शेलार, भास्कर शेलार, हिरामण ठाकरे आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### बेपत्ता असलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला महादेव बंधाऱ्यात

**मनमाड ।** गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या वीस वर्षीय तरुणाचा मृतदेह महादेव बंधाऱ्यात सापडल्याने मनमाड शहरात खळबळ उडाली आहे. ही आत्महत्या की नियोजित हत्या, यावरून अनेक तर्क-वितर्क सुरू असून शहरात चर्चेला उधाण आले आहे. शहरातील भारत नगर परिसरात राहणारा ओम धनवटे नावाचा तरुण रविवारी (ता. ३१ ऑगस्ट) सकाळी नेहमीप्रमाणे एका डिजिटल प्रिंटिंग दुकानात कामावर गेला होता. मात्र रात्री उशिरापर्यंत तो घरी परतला नाही. यानंतर त्याच्या आई व मित्रांनी परिसरात शोध घेतला, पण काहीही सुराग न लागल्याने मनमाड पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल करण्यात आली. दरम्यान, मंगळवारी दुपारी रेल्वे प्रशासनाला पाणीपुरवठा करणाऱ्या महादेव बंधाऱ्यात एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. ओम धनवटे याचा कुटुंबात आई व लहान भाऊ असा परिवार असून, तो कोणत्याही व्यसनापासून दूर होता, असे नातेवाईक आणि मित्रपरिवाराने सांगितले. विशेष म्हणजे, रविवारी त्याचा पगारही झाला होता, आणि शेवटच्या फोन पे व्यवहारात ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) येथे पेमेंट केल्याची नोंद दिसत आहे. त्यामुळे या प्रकरणाचा ऑनलाईन फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याशी काही संबंध आहे का, याचा तपास करण्याची मागणी होत आहे. दरम्यान पोलिसांकडून मृत्यूचे कारण अजून स्पष्ट झालेले नाही. खून की आत्महत्या? याचे उत्तर अद्याप मिळाले नसून, पोलीस तपास सुरू आहे.





### अन्यायाविरुद्ध लढा देणे हाच विद्रोह : प्रा.निशांत गुरू

**नाशिक ।** परिस्थितीला गुलाम करून मुकाटपणे अन्याय सहन न करता त्याविरूद्ध आवाज उठवला पाहिजे. शरणागती पत्करण्यापेक्षा अन्यायाविरुद्ध लढा देणे म्हणजे विद्रोह होय, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा.निशांत गुरू यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात १७९वे पुष्प गुंफताना 'वाघिणीचे दूध' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करीत होते. ज्येष्ठ विचारवंत तुकाराम ढिकले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रा.गुरू पुढे म्हणाले की, विद्रोह म्हणजे जातीपातीचे राजकारण नाही तर सामान्य माणसाला माणूस म्हणून जगण्याची दिशा दाखविणारे कार्य करून माणसामाणसात भेदभाव करणाऱ्यांवर प्रहार करायला हवा. विद्रोह देशविघातक, समाजविघातक नसतो. शिक्षणाने माणूस समृद्ध होतो. कारण शिक्षण हेच वाघिणीचे दूध आहे. वंचित समाजासाठी समता, बंधुता हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भेदभाव दूर करून आदर्श समाजव्यवस्था निर्माण करायला हवी. या पुस्तकात अशा विविध आशयाच्या रचना आहेत, असे सांगून संग्रहातील काही कविता सादर केल्या. अजित कुलकर्णी आणि बाळासाहेब उगले यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर सोमनाथ साखरे यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (५) प्रशांत कुलकर्णी 'सुधा मूर्ती' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.





### सिन्नर महाविद्यालयात नेट आणि सेट पेपर-१ वर व्याख्यान

**सिन्नर ।** येथील गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाने पदोत्तर विद्यार्थ्यांसाठी "नेट आणि सेट पेपर-१ या विषयावर वर व्याख्यान आयोजित केले. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते प्रा. दिपक भालेराव लाभले. त्यांनी नेट सेट पेपर-१ मध्ये कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात व त्याचे उत्तर कसे द्यावे याचे मार्गदर्शन दिले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. अंकिता रायते यांनी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षाच्या मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.यु.पाटील यांनी सेट आणि नेट चे प्राध्यापक नियुक्ती साठी शैक्षणिक अहर्ता असते आणि नेट सेट पास होण्यासाठी पेपर-१ किती उपयुक्त आहे असे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार, प्रा. एस. टी. पेखळे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मनोज गवारे, आय क्यू एफ सी चे सन्मवयक डॉ. सी. इ.गुरुळे, डॉ, अमोल काटेगावकर, प्रा धनराज बहिरम, श्रीमती कल्याणी मोरे, श्रीमती स्वाती चतुर आदी मान्यवर उपस्थित होते.



## महत्त्वाचे

### कसारा घाटातील महामार्गावर भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

**नाशिक ।** कसारा घाटाच्या मुंबई - नाशिक महामार्गावर मंगळवार (दि.३) रोजी हॉटेल



ऑरेंजजवळ रात्री १० वाजेच्या सुमारास कारचा भीषण अपघात होऊन यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. या अपघातात रियाज हासियत अली, आसादुला अली,अफजल बैतुलहा सर्व राहणार उत्तर प्रदेश अशी मृतांची नावे असून हे मुंबई नाशिक महामार्गावर भरधावं वेगात तीव्र वळणावर उतार उतरत असताना कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात झाला. अपघात ग्रस्त कारने जागेवर तीन पलट्या मारल्याने गाडीचा पूर्णपणे चुरा झाला होता. मंगळवारी रात्री मुंबईहून नाशिकच्या दिशेने जात असतांना कसारा जवळील ऑरेंज हॉटेलच्या समोर अपघात झाल्याची माहिती मिळताच महामार्ग सुरक्षा पोलीस पथक व आपत्ती व्यवस्थापन टीम सदस्य, कसारा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरु केले. रुग्णवाहिकेच्या मदतीने अपघातग्रस्तांना कसारा शासकीय रुग्णालयात दाखल केले. या अपघाताची कसारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### जलशये, धरणांत गणेशमूर्ती विसर्जन न करण्याचे आवाहन

नाशिक । मृद व जलसंधारण विभागांतर्गत नाशिक विभागाच्या कार्यकक्षेतील अस्तित्वातील जलसंधारण योजनांतील पाणी हे प्रामख्याने गावे व शहरांसाठी तसेच धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांसाठी पिण्याकरीता, शेती सिंचनासाठी वापरण्यात येते. गणशोत्सव 2025 पर्वाची सांगता करतेवेळी जीवित हानीच्या घटना व जलप्रदूषण टाळण्यासाठी जलाशयात, सिंचन तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव, को.प.बंधारे यामध्ये गणेशमूर्ती व निमाल्य विर्सजित करू नये, असे आवाहन मृद व जलसंधारण विभागाचे प्रादेशिक जलसंधारण अधिकारी ह.का. गिते यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. गणेशमूर्ती व निर्माल्य विसर्जन करण्यास प्रतिबंध करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून धरण परिसर प्रदुषणमुक्त व नागरिकांच्या सुरक्षा योग्य राहील. यासाठी क्षेत्रीय अधिकारी यांनी धरण परिसरातील शहरे व गावातील नगारिकांना स्थानिक पातळीवर व ग्रामपंचायत स्तरावर गणेशमूर्ती विसर्जनासाठी तातपुरत्या स्वरूपात कृत्रिम जलकुंभ तयार करावेत व निर्माल्य कलश स्वतंत्र ठेवण्यात यावा, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### म्हसरुळला मनात राग धरून महिलेसह मारहाण

**नाशिक ।** तीन दिवसांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून महिलेला आणि कुटुंबातील सदस्यांना अश्लील शिवीगाळ करीत लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची घटना म्हसरूळ परिसरात घडली आहे. या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. म्हसरूळ येथील ऋषिराज गॅलक्सी, रामेश्वरनगर येथील हि घटना असून, फिर्यादीचे तीन दिवसांपूर्वी एका महिलेशी भांडण झाले होते. समोपचाराने हा वाद मिटविण्यासाठी परिसरातील गणेश गिते यांनी फिर्यादी आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांना बोलावून समजावून सांगत असतांना, याठिकाणी रोहिणी घुगे हिने फिर्यादीला खाली पाडत वस्त्रे ओढली. त्यानंतर संतोष घुगे आणि गणेश खुर्दल याने अश्लील शिवीगाळ करत फिर्यादीसह पतीला आणि बहिणीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच दिव्यांग असलेल्या नातवाला येथे राहिले तर जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारणी रोहिणी घुगे, संतोष घुगे, गणेश खुर्दळ, भारत गिते, शिवानी खुर्दळ, सागर भागवत, मालती पाटील, समाधान बच्छाव, जयश्री बच्छाव सर्व (रा.म्हसरूळ) विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पो.उपनिरीक्षक एम.एफ. क्षीरसागर अधिक तपास करीत आहे.

### मराठा क्रांती स्वराज्य संघटनेच्या नाशिक जिल्हा अध्यक्षपदी पवार

**सटाणा ।** मराठा क्रांती स्वराज्य संघटनेचे



संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले, राष्ट्रीय अध्यक्ष विजय कदम (सूरत), राष्ट्रीय सरचिटणीस प्रदीप मोरे (बडोदा), महाराष्ट्र राज्य अध्यक्ष गुरुनाथ यशवंतराव यांच्या आदेशानुसार जेष्ठ नेते दिपक धट पाटील यांनी आराई येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास पवार यांची नाशिक जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. यावेळी संघटनेचे सल्लागार, सेवानिवृत्त सहायक पोलिस आयुक्त अरविंद महापदी यांनी सांगितले की, मराठा आरक्षण, शेतकरी आंदोलन, गडकिल्ले संवर्धन, हिंदुत्ववादी संघटनांमध्ये काम करण्याचा अनुभव तसेच शिवशंभू संघटनेचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख म्हणून केलेले काम या सर्व बाबी लक्षात घेऊन पवार यांची जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीची घोषणा होताच संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

# सिव्हील हॉस्पिटलचे आरोग्य धोक्यात!



## निफाड शहरात आठ किलो गांजा जप्त; एक जण पोलिसांच्या जाळ्यात



**निफाड ।** नाशिक ग्रामीण पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी मोहिमेला यश मिळाले असून निफाड शहरातील पेठगल्ली येथून तब्बल ८ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी एका संशयितास अटक केली असून जप्त मालाची किंमत १ लाख ६० हजार रुपये इतकी आहे. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी अमली पदार्थ विक्रेत्यांवर कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर गुप्त माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली. निफाड पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सोनल फडोळ व त्यांच्या पथकाने पेठगल्लीतील गणेश किराणा दुकानावर छापा टाकला. तपासणीदरम्यान दुकानातील लाकडी दरवाज्याच्या मागे ठेवलेल्या काळ्या रंगाच्या बॅगमध्ये ८ किलो गांजा आढळून आला. या प्रकरणी दुकानमालक संदीप उर्फ गणेश आशोक राऊत (वय ४५, रा. पेठगल्ली, निफाड) यास ताब्यात घेण्यात आले. जप्त केलेला मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून पोलिस शिपाई विक्रम लहाणे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपीवर एनडीपीएस. कायद्यान्वये कलम ८(क), २०(ब)(II) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ करीत आहेत.

## मराठा आरक्षणावर सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत




भाजपच्यावतीने आनंदोत्सव साजरा...

**नाशिक ।** मराठा आरक्षणाच्या मागण्यांवर महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत भारतीय जनता पार्टी नाशिक महानगर जिल्हा भाजपच्या वतीने आंदोत्सव साजरा करण्यात आला.

अशोक स्तंभ येथे हा आनंदोत्सव पार पडला. मराठा आरक्षणासाठी गेल्या काही महिन्यांपासून संघर्ष करणारे समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या मान्य करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या सकारात्मक निर्णयानंतर नाशिक भाजपने "धन्यवाद देवाभाऊ" अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. मंत्रिमंडळ उपसमिती आणि जरांगे पाटील यांच्यात झालेल्या फलदायी चर्चेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याने मराठा समाजात आनंदाची लाट उसळली आहे. या आंदोत्सवाला भाजपा महानगर व जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोर्चा, युवा मोर्चा तसेच मोठ्या संख्येने मराठा समाजातील बांधव उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. मराठा आरक्षणाबाबत सरकारने दाखवलेली सकारात्मक भूमिका आणि समाजाच्या भावनांना न्याय देणारा निर्णय हा खऱ्या अर्थाने ऐतिहासिक असून या निर्णयामुळे मराठा बांधवांचे भविष्य सुरक्षित झाले आहे अशी भावना या वेळी विविध मान्यवरांनी व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय शिवजी, जय भवानी, भारत माता की जय, एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत आंदोत्सवाचा समारोप केला. यामध्ये भाजप नाशिक महानगर जिल्हाध्यक्ष सुनील केदार, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, नेते महेश हिरे, सुरेश पाटील, सागर शेलार, स्वाती भामरे, सचिन मोरे, जितेंद्र चोरडिया, विकास एखंडे, उत्तम उगले, रामहरी सांभेराव, दिगंबर धुमाळ, प्रवीण भाटे, प्रशांत वाघ, अनिता भामरे, प्रवीण पाटील, रुपेश पाटील, सिद्धेश खैरनार, त्र्यंबक कोंबडे, राजीव भामरे, प्रेम पाटील, रोहन कानकाटे, पवन पाटील, महेश भामरे, अनिता भामरे, कमलेश पिंगळे, नीलेश जोशी, अमोल पवार, समीर व्यवहारे आणि ह्यासह अनेक भाजपा आणि मराठा कार्यकर्ते उपस्थित होते.

## ठक्कर बाजार परिसरातील खून प्रकरणातील तीन विधीसंघर्षित बालके ताब्यात

**नाशिक ।** ठक्कर बाजार बसस्थानक परिसरात दगडाने ठेचून खून करणाऱ्या तिघा विधीसंघर्षित बालकांना गुन्हेशाखा युनिट क्र. १ ने शिताफीने ताब्यात घेतले. हा खून त्यांच्या मैत्रिणीची छेड काढल्याच्या कारणावरून झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.

सरकारवाडा पोलीस ठाणे हद्दीत २ सप्टेंबर रोजी एका इसमाच्या डोक्यात फुटपाथवरील सिमेंट ब्लॉकने मारहाण करून खून करण्यात आला होता. या घटनेवरून सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, गुन्हे शाखेचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण व सहायक पोलीस आयुक्त संदिप मिटके यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने शोधमोहीम राबवली.

दरम्यान, पोउनि चेतन श्रीवंत यांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर पथकाने मेळा बसस्थानक परिसरात सापळा रचून संशयित बालकांना पकडले. पोलिसांना पाहून ते पळण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी छेडछाडीच्या वादातून खून केल्याची कबुली दिली. सदर विधीसंघर्षित बालकांना पुढील कारवाईसाठी सरकारवाडा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई गुन्हेशाखा युनिट क्र. १ च्या पथकाने केली असून त्यात पोउनि चेतन श्रीवंत, पोउनि किरण शिरसाठ, पोउनि मधुकर कड, तसेच सुदाम सांगळे, प्रविण वाघमारे, प्रशांत मरकड, संदिप भांड, विशाल देवरे, विशाल काठे, नाझीमखान पठाण, योगीराज गायकवाड, मिलींदसिंग परदेशी, उत्तम पवार, रमेश कोळी, महेश साळुंके, धनंजय शिंदे, रविंद्र आढाव, रोहिदास लिलके, अमोल कोष्टी, जगेश्वर बोरसे, राहुल पालखेडे, नितीन जगताप, मुक्तार शेख, राम बर्डे, शर्मिला कोकणी व सुकाम पवार आदींचा समावेश होता.

## पंचवटी-म्हसरूळ परिसरातील घरफोड्यांचा मास्टरमाईंड जेरबंद

**नाशिक ।** पंचवटी व म्हसरूळ हद्दीत दहाहून अधिक घरफोड्या करून पोलिसांच्या नाकी नऊ आणणारा सराईत गुन्हेगार अखेर गुन्हे शोध पथकाच्या सापळ्यात अडकला. फारूक रज्जाक काकर (वय ४८, रा. लोहारी बु.) या आरोपीकडून तब्बल ११ तोळे सोने, १ किलो ५२ ग्रॅम चांदी असा १३ लाख ६ हजार ७५४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. २३ रोजी पंचवटी पोलीस ठाणे हद्दीत मखमलाबाद रोडवरील कल्पेश पार्कमध्ये घरफोडी झाली होती. या प्रकरणी दाखल गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची चिरफाड केली. आरोपीचे हालचाली, गुन्ह्याची वेळ आणि पद्धत (एमओबी) यांचा सखोल अभ्यास करून त्याच्या मुसक्या आवळण्याची योजना आखण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि



सतिश शिरसाठ यांनी दोन पथके तयार करून ३-४ दिवस सलग रात्री मखमलाबाद रोड, ड्रिम कॅसल, गणेशनगर, औदुंबरनगर, अमृतधाम परिसरात सापळा रचला. दि. २६ रोजी रात्री ११.३० वाजता संशयित इसम पथकाच्या हाती लागला.अटक करताच आरोपीने आपले नाव फारूक रज्जाक काकर (वय ४८, रा. जळगाव जिल्हा) असे सांगितले. पंचांच्या उपस्थितीत घेतलेल्या अंगझडतीत त्याच्याकडून घरफोडीचे साहित्य व मुद्देमाल हाती आला. चौकशीत त्याने पंचवटी व म्हसरूळ परिसरातील १० घरफोड्यांची कबुली दिली. ही कारवाई पोलिस आयुक्त संदिप कर्णिक, उपायुक्त मोनिका राऊत, सहायक आयुक्त संगिता निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये वपोनि गजेंद्र पाटील, सपोनि सतिश शिरसाठ, सपोउनि संपत जाधव, पोहवा कैलास शिंदे, अमोल काळे, महेश नांदुर्डीकर, पोना जयवंत लोणारे, पोशि युवराज गायकवाड, अंकुश काळे, वैभव परदेशी, सचिन बाहिकर, योगेश वायंकडे, विनोद चितळकर, नितीन पवार, तानुजा शिंदे आदींचा समावेश होता.

## सरकारचा सकारात्मक निर्णय; मराठा समाजात जल्लोष

### नाशिकच्या कालिका मंदिरात सकल समाजाचा उत्सव

**नाशिक ।** मराठा आरक्षणासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या संघर्षाला अखेर यश मिळाले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला सरकारने सकारात्मक प्रतिसाद देत मराठा समाजाला आरक्षणाचा अधिकार मान्य केला. या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण मराठा समाजात आनंदाचा जल्लोष उसळला असून नाशिकमध्ये ग्रामदैवत कालिका मंदिरात सकल मराठा समाजाच्या वतीने उत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी सर्वप्रथम देवी कालिकेची महाआरती करण्यात आली. त्यानंतर समाजबांधवांनी घोषणाबाजी करत, एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला.



पुढे डीजेच्या तालावर ठेका धरत कार्यकर्त्यांनी उत्सवाला रंगत आणली. संपूर्ण परिसर "जय जिजाऊ, जय शिवराय" आणि "मराठा आरक्षण विजय असो" या घोषणांनी दुमदुमून गेला. उपस्थितांना मार्गदर्शन करताना विलास पांगारकर यांनी या निर्णयामागील दीर्घ संघर्षाची माहिती दिली. तसेच करण गायकर, प्रफुल वाघ, नितीन सुगंधी, अण्णासाहेब पाटील यांच्यासह महिला, तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठा समाज हा परंपरेने शेतकरी व शूर योद्धा म्हणून ओळखला जातो. शिक्षण, नोकरी आणि प्रगतीत समान संधी मिळावी यासाठी समाजाने अनेक वर्षे आरक्षणाची मागणी केली होती. त्यामुळे सरकारचा हा निर्णय मराठा समाजाच्या इतिहासातील एक अभिमानाचा टप्पा ठरत असल्याचे मत नेत्यांनी व्यक्त केले.



"आज मराठा समाजाच्या हक्काच्या लढ्याला मोठ यश मिळालं आहे ही फक्त घोषणा नाही तर मराठा समाजाच्या अस्मितेचा विजय आहे. हा विजय प्रत्येक मराठा तरुण शेतकरी विद्यार्थी व समाजातील प्रत्येक घटकाचा आहे. आपण सर्वांनी मिळून हा लढा लढला आणि आज विजय आपला झाला आहे.

**- नितीन सुगंधी -कापसे, अध्यक्ष, मराठा सेवा संघ**

# फायनल फाइट... लढा यशस्वी?

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून लढा सुरू होता. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करत या लढ्याला वेगळे वळण दिले. या पूर्वी देखील मनोज जरांगे यांनी अनेकवेळा आंदोलन केले, मोर्चे काढले होते. मात्र, आरक्षण काही मिळत नव्हते. अखेर आता शेवटची लढाई म्हणत मनोज जरांगे यांनी २७ ऑगस्ट रोजी त्यांनी हजारो समर्थकांसह मुंबईच्या दिशेने कूच करण्यास सुरुवात केली.

-------------------

मनोज जरांगे यांनी मुंबईची वाट धरली आणि टप्प्या-टप्प्यावर हजारोंच्या संख्येने असलेले मराठा बांधव लाखोंच्या संख्येत वाढत गेले. मुंबईमध्ये दाखल होण्यापूर्वी मनोज जरांगे यांनी शिवसेनरीला भेट दिली. महायुती सरकारकडून मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हालचाली तोपर्यंत वाढल्या होत्या आणि त्यानुसार मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष बनवले आणि मंत्र्यांच्या बैठकांना सुरुवात झाली.

**जरांगे मुंबईत धडकले**

मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलन करू नये म्हणून अनेकांनी प्रयत्न केले. त्यात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका देखील दाखल केली होती. त्यानुसार मुंबईच्या दिशेने असतानाच मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला परवानगी नाकारली.

असा निर्णय आलेला असताना देखील मनोज जरांगे यांची मुंबईच्या दिशेने कूच सुरूच राहिली. त्यानंतर मुंबई पोलिसांनी मराठा आंदोलकांसाठी मुंबईत येण्यासाठी एक रस्ता निश्चित केला. आणि अखेर २९ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे मुंबईच्या आझाद मैदानात पोहोचले. यावेळी संपूर्ण राज्यातून मराठा समाज हा मुंबईत दाखल झाला होता.

**मुंबईत जिकडे तिकडे मराठेच**

आंदोलनाला सुरुवात झाली आणि मुंबईत सगळीकडे मराठा बांधवांची गर्दी पाहायला मिळाली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर मराठ्यांनी ठाण मांडला. आझाद मैदान देखील मराठा बांधवांनी भरून गेले. उपोषणाला बसल्यावर मनोज जरांगे यांनी सर्व आंदोलकांना शांतता राखण्याचे आवाहन केले तसेच यावेळी भाषणात त्यांनी महायुती सरकारवर विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

**एकतर विजयी यात्रा नाहीतर अंत्ययात्रा..**

मनोज जरांगे यांनी उपोषणाला सुरुवात केली आणि दुस?्या दिवशी त्यांची प्रकृती थोडी खालावली. तसेच मराठा आंदोलकांची मुंबईत गैरसोय होत असल्याचे त्यांना समजले व त्यांनी सायंकाळी भाषण करताना मराठा बांधवांना त्रास देऊ नका तसेच अन्न-पाण्याची सोय करण्यात यावी अशी सरकारकडे विनंती केली.

त्यानंतर राज्यभरातून गावागावातून मुंबईतील मराठा आंदोलकांसाठी जेवण पाठवण्यास सुरुवात झाली. तसेच सरकारकडून केवळ बैठकाच सुरू असल्याने मनोज जरांगे यांनी भाषणात महायुतीवर टीका केली. आता ही शेवटची लढाई आहे, आता एकत्र आपली विजयी यात्रा निघेल, नाहीतर माझी अंत्ययात्रा निघेल, असा निर्धारच मनोज जरांगे यांनी बोलून दाखवला.

**उच्च न्यायालयाने घेतली कठोर भूमिका**

मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. कोटार्ने आज दुपारी या प्रकरणी झालेल्या संक्षिप्त सुनावणीत मुंबईत जे काही सुरू आहे ते पूर्णतः बेकायदा सुरू असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारने दुपारी ४ वाजेपर्यंत सर्वकाही सुरळीत केले नाही, तर कोर्ट या प्रकरणी अत्यंत कठोर भूमिका घेईल, असे कोर्टाने म्हटले होते.

उच्च न्यायालयाने मराठा आंदोलकांनी नियम मोडल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलकांना केवळ आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी होती, मात्र त्यांनी या नियमाचे उल्लंघन केले, असे न्यायालयाने नमूद केले. तसेच तुम्ही अजूनही आझाद मैदान व आसपासचा परिसर रिक्त का करू शकला नाहीत? आंदोलकांना तिथून हटवण्यासाठी तुम्हाला जरांगे यांचीच मदत का घ्यावी लागतेय? असे प्रश्न उपस्थित करत उच्च न्यायालयाने राज्य सरकारलाही खडेबोल सुनावले. यानंतर सुनावणी दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली होती.



**विखे पाटील आझाद मैदानात**

मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच इकडे सरकारच्यावतीने शिष्टमंडळ मसुदा घेऊन मनोज जरांगे यांना दाखवण्यासाठी निघाले. उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच मंत्री उदय सामंत यांनी मनोज जरांगे यांची भेट घेत त्यांना मसुदा दाखवला.

यावेळी मनोज जरांगे यांनी त्यांच्या वकिलांच्या टीमच्या मार्फत मसुदा वाचन केले. त्यानंतर फक्त मसुदा नको तर जीआर पाहिजे, अशी मागणी केली. त्यानुसार राधाकृष्ण विखे पाटलांनी एक तासात जीआर येणार असे आश्वासन दिले.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी सगेसोयरेंच्या अध्यादेशावर ८ लाख हरकती आल्याचे जरांगे यांना सांगितले. यावेळी मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी जरांगेंना सातारा गॅझेट लागू करण्याची ग्वाही दिली. त्यानंतर जरांगेंनी यासाठी सरकारला १ महिन्याचा वेळ देण्याची तयारी दर्शवली.

**हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय**

मंत्री विखे पाटील यांनी यावेळी मनोज जरांगे यांना सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली. जरांगे याविषयी बोलताना सांगितले, सरकारने हैदराबाद गॅझेटियरची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे.

सातारा संस्थानच्या गॅझेटियरमध्ये पश्चिम महाराष्ट्र संपूर्ण बसतो. सातारा गॅझेटियर तथा पुणे व औंध गॅझेटियरची अंमलबजावणी करण्याच्या मुद्यावर कायदेशीर बाबी तपासून जलदगतीने निर्णय घेण्यात येईल असे सरकारने सांगितले आहे. या प्रकरणी २-३ मुद्यांवर कायदेशीर त्रुटी आहेत. पण सरकारने त्यावरही १५ दिवसांत योग्य ती कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे.

**सरकारला २ महिन्यांची मुदत**

मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा व कुणबी एकच असल्याच्या मुद्यावर सरकारला २ महिन्यांची मुदत देण्याची घोषणा केली. ते म्हणाले, आम्ही सरकारकडे ५८ लाख नोंदींच्या आधारावर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढण्याची मागणी केली होती.

त्यावर सरकारने हा मुद्दा क्लिष्ट असल्यामुळे त्यावर निर्णय घेण्यासाठी महिन्याभराची मुदत मागितली होती. मी त्यांना दीड महिन्यांची मुदत दिली. पण विखे पाटलांचा हात थोड जड आहे. त्यांनी २ महिन्यांचा वेळ मागितला. त्यानुसार आम्ही त्यांना ही मुदत दिली. या मुदतीनंतर मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढला जाईल.

**जीआर की राजकीय खेळी?**

मराठा आरक्षणावरून राज्यात पुन्हा राजकीय चक्रावणं सुरू झालंय. सरकारने मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट अंमलबजावणीचा जीआर काढला. त्याचबरोबर आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, मृतांच्या कुटुंबीयांना मदत व नोकरी यांसारख्या घोषणा करण्यात आल्या. पण हा जीआर खरंच मराठा समाजाला दिलासा देणारा आहे का, यावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

मराठा आरक्षणासाठी न्यायालयीन लढा देणारे आणि आंदोलक नेते विनोद पाटील यांनी थेट सरकारला आणि उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांना आव्हान दिलं आहे. हा जीआर समाजाला टाचणीएवढाही फायदा देणार नाही. छाती ठोकून सांगतो, यातून एकाचंही सर्टिफिकेट निघणार नाही. विखेंनी पत्रकार परिषद घेऊन याचा अर्थ स्पष्ट करावा, असा त्यांचा टोला.

विनोद पाटील इथवरच थांबले नाहीत. त्यांनी सरकारच्या या निर्णयाला थेट १०० पैकी मायनस झिरो मार्क्स दिले. शिंदे सरकारने गेल्यावेळी गुलाल खेळला, त्याचं उत्तर आजवर मिळालं नाही. आता विखेंनी गुलाल खेळला आहे, त्यांनी तरी उत्तर द्यावं, असं ते म्हणाले.

मनोज जरांगे यांची मुंबईवरची धडक, आंदोलकांच्या गर्दीमुळे मुंबईची झालेली तुंबई आणि त्यातच सरकारची झालेली गोची पाहता यातून सूटका करण्यासाठी राज्य सरकारने तडकाफडकी काही जीआर काढले खरे. परंतु, कायद्याच्या कसोटीत ते टिकणार का? मराठा समाजात अपेक्षेचं वातावरण असताना या नव्या घडामोडींनी गोंधळ उडवला आहे. सरकारची ही घोषणा केवळ राजकीय खेळी आहे का, की खरंच यातून आरक्षणाचा मार्ग सुटेल? विखेंचं उत्तर आता सर्वांच्या प्रतीक्षेत आहे.

# ओबीसींच्या हक्कांची खरी लढाई आता सुरु

कुणबी आरक्षणाची आकस्मिक वापर होऊ लागले आहे. मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळवून देण्याची ही प्रक्रिया अस्वीकार्य आहे. त्यामुळे कुणबींच्या आरक्षणावर अतिक्रमण होऊ शकते. मनोज जरांगे यांचे उपोषण संपले आणि सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला पण केवळ व्यक्तिगत तपासणीनंतरच लाभ मिळेल. सरसकट आरक्षणाची मागणी मान्य होणार नाही.

ओबीसी आरक्षणात मराठ्यांचा प्रवेश होणार असल्यामुळे कुणबी समुदायाला संभाव्य नुकसान सोसावे लागणार आहे. यामुळे ओबीसी आरक्षणात मराठ्यांची प्रवेश प्रक्रिया आणि प्रमाणपत्र प्रणाली वाढण्याची आशंका, आणि ओबीसी संघटनांचा ठाम विरोध, आंदोलन सुरूच राहणार आहे.



अरूण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

ओबीसी समाज हा देशातील सर्वात मोठा घटक असूनही त्यांच्यावर सातत्याने अन्याय होत आला आहे. राजकीय नेते, संघटना आणि माध्यमे याबाबत मौन धारण करून राहतात, तर काही जण मुद्दाम गोंधळ निर्माण करून समाजाचे लक्ष भरकटवतात. म्हणूनच आज ओबीसींच्या हक्कांसाठी स्पष्ट भूमिका घेण्याची आणि एकत्रितपणे लढण्याची गरज आहे.

**आंदोलनाचे मुख्य मुद्दे**

ओबीसींवर होणारा अन्याय उघड करण्यासाठी आणि समाजाला जागृत करण्यासाठी काही ठोस प्रश्नांवर आंदोलन तीव्र झाले पाहिजे, जसे...
सरकारी नोकरभरतीतील अन्याय
सरकारी उपक्रमांचे खाजगीकरण
जातनिहाय जनगणना
लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण
आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा हटविणे
शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे

**मंडल ते कमंडल**

मंडल आयोगाचा अहवाल ( १९८० ) हा ओबीसींच्या सक्षमीकरणाचा ऐतिहासिक दस्तऐवज होता. पण १९९० मध्ये जेव्हा व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाची शिफारस अंमलात आणली, तेव्हा देशभरात विषारी प्रचार करण्यात आला.

माध्यमांनीही ओबीसी समाजात गैरसमज निर्माण केला. मंडलच्या प्रभावाला तोडण्यासाठीच त्याच काळात कमंडल यात्रा उभी करण्यात आली, हे आजही विसरून चालणार नाही.

**सध्याचे वास्तव**

आज मोठ्या प्रमाणावर सरकारी नोकर भरती थांबवली जात आहे.

खाजगीकरणामुळे आरक्षणाला मारक परिस्थिती तयार केली जात आहे. विद्यार्थ्यांना पूर्ण शिष्यवृत्ती न देता अर्धवट शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या प्रगतीत अडथळे घातले जात आहेत. नॉट फार सुटेबल या नावाखाली आरक्षणाची गळचेपी केली जात आहे.

रोहिणी आयोगाने ओबीसींना मिळणारे २७ टक्के आरक्षण तीन गटात विभागण्याची शिफारस केली आहे. हा प्रस्ताव समाजाच्या एकतेला बाधक ठरू शकतो.

दुसरीकडे बिहारने जातनिहाय जनगणना करून लोकसंख्येनुसार आरक्षण दिले, तर दक्षिण भारतातील राज्यांनी ५० टक्केची मयार्दा केव्हाच ओलांडून ती नवव्या अनुसूचीत टाकली. महाराष्ट्रात मात्र समाज या गोष्टींपासून अनभिज्ञ आहे.

**मुख्य प्रश्न कोणता?**

मराठा समाजाचा ओबीसी आरक्षणात समावेश शक्य नाही. त्यामुळे समाजाला भुलवण्याऐवजी जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के आरक्षण मयार्दा हटविणे हाच खरा तोडगा आहे. आज जेव्हा बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, कायदा सुव्यवस्था यांसारखे गंभीर विषय उभे ठाकले आहेत, तेव्हा आरक्षणाच्या वादामुळे हे प्रश्न मागे पडत आहेत.

**निष्कर्ष**


ओबीसींनी आपले हक्क ओळखून सजग व्हावे. नेते, संघटना आणि राजकीय पक्षांनी एकत्र येऊन या लढ्याला दिशा द्यावी. आरक्षणाच्या वादाला तोडगा फक्त दोनच... जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के मर्यादा हटविणे. समाजाने हेच लक्षात ठेवून पुढील लढ्याची तयारी निश्चितपणे करायलाच हवी.

■ ■ ■

# प्रज्ञाचक्षु तत्वज्ञ : संत गुलाबराव महाराज

महाराष्ट्राच्या थोर संत परंपरेतील अलीकडच्या काळातील ज्ञानेशकन्या म्हणून संत ज्ञानेश्वरांच्या तत्व चिंतनाला जीवन समर्पित करणारे संत गुलाबराव महाराज होय.

त्यांचा जन्म सन १८८१ ला आजोळघरी लोणी टाकळी, जि. अमरावती येथे गोंडूजी आणि आलोकाबाई मोहोड या दांपत्याच्या पोटी झाला. वयाच्या नवव्या महिन्यातच त्यांच्या डोळ्याला जंतूसंसर्ग झाल्यामुळे अंधत्व आले.



संत भूतलावर जन्म घेतात ते जीवांच्या कल्याणासाठी, त्यांना लाभलेले आयुष्य जरी कमी असले तरी समाजाप्रतीचे योगदान अफाट व अतुलनिय असते. संतांचा जीवनक्रम आणि कायार्ची भिन्नभिन्न वैशिष्ट्ये असतात.

संत गुलाबराव महाराजांना 'ज्ञानेशकन्या' आणि 'प्रज्ञाचक्षु' या संबोधनाने ओळखल्या जातात. श्रीकृष्णाच्या प्रेमात रममान झालेले व संत ज्ञानेश्वरांच्या वांग्मयावर अफाट प्रेम करणारे गुलाबराव महाराज स्वतःला ज्ञानेशकन्या मानतात. तर दुसरे प्रज्ञाचक्षु म्हणजे अशी व्यक्ती जी जन्मानंतर आंधळी झालेली असली तरी बुद्धीच्या आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सर्व गोष्टींचे मर्म जाणतो अशांना प्रज्ञाचक्षु म्हणतात. हाच स्वरूपधर्म संत गुलाबराव महारांजांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.

संत गुलाबराव महाराजांचा जीवनपट बघता अतिशय प्रतिकुल परिस्थितला आहे. नऊ महिन्याचे असताना त्यांच्या डोळ्याला जंतू संसर्ग झाल्यामुळे त्यांना कायमचे अंधत्व आले. वयाच्या चौथ्या वर्षी आई वारली. पुढे लोणी टाकळीहून माधान येथे आले.त्यांच्यात थोर प्रज्ञाशक्ती त्यांच्या प्रगट झाली. त्या बळावरच पुरातन ग्रंथांचे आकलन ते सहज करीत गेले. मनकर्णिका सोबत विवाह झाला. लक्ष्मण भटांकडून संस्कृत ग्रंथ ऐकून पाठांतर केले.

त्यांनी आकलन, शब्द रूपावली, लघु व्याकरण ही ग्रंथे मुखद्गत करून त्यांनी संस्कृत भाषेतही प्रवेश मिळविला. इतर धर्मांचे ग्रंथांचे श्रवण त्यांनी केले. अल्पावधीत संस्कृत पंडित झाले. जन्मतःअंध असताना; कुठलेही शिक्षण नसताना श्रवण पाठांतराच्या बळावर विपुल ग्रंथ लेखन इतरांकरवी करून घेतले, हे मोठे विलक्षण वाटते.

मराठी, हिंदी, संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराजांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगितासह अनेक भाषेसोबतच बोली भाषेत अनेक विषयांवर विपुल लेखन केले आहे. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, आत्मचरित्र, आख्यान, नाटक, लोकगीते, स्तोत्र, व्याकरण, कोश, आदी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले.

सहस्त्र ओव्या, श्लोकांची निर्मिती त्यांनी केली. अलौकिक व्याख्याने..धर्म समन्वय... प्रेम निकुंज.. योग प्रभाव.. साधूबोध ही त्यांची प्रचलित पुस्तके होय. महाराजांच्या ग्रंथसंपदेचे जतन करण्याचे कष्ट डॉ. राम पंडितांनी केले होते.

एकही वर्ग शाळा न शिकलेले संत गुलाबराव महाराज एका विलक्षण बुद्धीच्या बळावर अलीकडच्या शास्त्रज्ञांच्या सिद्धांतावर त्यांनी अभ्यास केला. त्यामध्ये डार्विनचा उत्क्रांतीवाद, आईन्स्टाईनचा अणुसिद्धांत, जगदीशचंद्र बोस यांचे वनस्पतीशास्त्र या सर्वांचा सखोल अभ्यास करून सटीक लेखन करून ठेवले.

संत गुलाबराव महाराजांचे कार्य ज्ञान, विज्ञान, धर्म, संस्कृती एवढ्या पुरतेच मर्यादित नसून त्यांनी साधुबोध या ग्रंथातून मानवी जीवनाचा उद्धार कसा होईल याचे विवेचन सुद्धा केले आहे. प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीची सांगड घालून जीवन कसे जगावे? याचे अनमोल मार्गदर्शन लाभलेले आहे. पावसाच्या पाण्यावर जो शेतकरी अवलंबून राहील त्याची पूर्णतः प्रगती आयुष्यात कधी होणार नाही.पाण्याचा अभाव असताना त्याला तांत्रिक पद्धतीने पाण्याच्या शेतीसाठी उपयोग करून घेता येईल, तोच शेतकरी विकासाच्या वाटेने मार्गस्थ होईल. असे ते स्पष्टपणे मांडतात.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

वेदांतकेसरी बाबाजी महाराज पंडित या शिष्यावर त्यांचे प्रचंड प्रेम होते.त्यांनी महाराजांची ग्रंथसंपदा जतन केली. त्यांचा ग्रंथसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटीच्या आत दहिसाथीत असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात सुरक्षितपणे जपून ठेवल्याचे सांगितले जाते.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा फेटा घातलेले पहिले तैलचित्र अकोल्याच्या चित्रकारांकडून गुलाबराव महाराजांनी करून घेतले होते. ते तैलचित्र आजही आळंदीच्या संजीवन समाधी मंदिराच्या गाभाऱ्यात दर्शनी भागावर आहे. हे महाराष्ट्रासाठी सर्वात मोठी देणगी आहे. असा हा तत्वज्ञानी समाजाला तत्त्वचिंतनाचे दान सपूर्द करून वयाच्या चौत्तीसाव्या वर्षी जगाचा निरोप घेतला. आज भाद्रपद शुक्ल द्वादशी पुण्यस्मरण दिनाच्या प्रसंगी महात्म्याला शब्दसुमनें समर्पित करुया..!

■ ■ ■

# गणेश विसर्जन करतांना बाळगावी सावधगिरी!

सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात अतिवृष्टीमुळे, ढगफुटीमुळे अनेक भाग जलमग्न झालेला आहे. यामुळे काही भागातील नदी-नाले, तलाव, विहिरी व समुद्र किनारा या सर्व तुडुंब भरलेल्या आहेत. गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे. त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

गणपती विसर्जन करतांना नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत दुर्घटना होऊ शकते अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. मागील वर्षी २०२४ ला राज्यभरात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ जणांचा मृत्यू झाला.धुळ्यातील चितोड येथे ३ बालकांचा मृत्यू झाला, नाशिक येथील पाथर्डी फाटा परिसरात २ युवकांचा मृत्यू झाला, अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात ३ जण नदित वाहून गेले,

अहमदनगर जिल्ह्यात २ युवकांचा मृत्यू, जिंतूर तालुक्यात २ जणांचा मृत्यू, अकोला जिल्ह्यात एकाजणाचा मृत्यू. त्यामुळे गणेश विसर्जन सावधगिरीने करावे.त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक परिवारावर मोठा आघात करू शकते.

खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढवून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण (स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवलेल्या कृत्रिम तलावामध्ये विसर्जन करायला हवे.

यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सवार्नी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी. मुर्ती विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत. या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.




रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

ज्या-ज्या ठिकाणी कृत्रीम तलावची व्यवस्था केलेली आहे, त्या त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी, विहीर, समुद्र किनारा किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात. अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे. छोटीशी चुक मोठा आघात पोहचवू शकते.

गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे निर्माल्य तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केली आहे त्याठिकाणीच टाकावे. यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.

अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे. गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या! असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो. परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा.यामुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या... जय श्री गणेशाय नमः!



# महिलांनो रोज लिपस्टिक लावत असाल तर सावधान!

लिपस्टिक म्हटलं की श्रृंगारातील महिलांचा आवडती मेकपची वस्तू. अनेकींना तर लिपस्टिकचे कलेक्शन करणे प्रचंड आवडते. लिपस्टिक लावणे आजकाल प्रत्येक महिलेच्या मेकअप रूटीनचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. पण तुम्हाला माहिती आहे का की दररोज लिपस्टिक लावण्याची सवय हळूहळू आरोग्याला हानी पोहोचवू शकते?

**लिपस्टिकमध्ये शिसे असते**

बहुतेक लिपस्टिकमध्ये शिसे नावाचा हानिकारक धातू असतो, जो हळूहळू शरीरात जमा होऊ लागतो आणि हार्मोनल असंतुलन, प्रजनन समस्या आणि मानसिक विकासात अडथळा निर्माण करू शकतो. लिपस्टिक वारंवार लावल्याने आपण काही खाताना, जेवताना किंवा पाणी पिताना देखील थोडी थोडी लिपस्टिक आपल्या पोटात जाते आणि त्याद्वारे हे रसायन शरीरात जाते ज्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो.

ओठ काळे आणि कोरडे होऊ शकतात.

लिपस्टिकमध्ये असलेले रसायने आणि प्रिजर्वेटिव्स ओठांमधील ओलावा काढून टाकू शकतात, ज्यामुळे ते हळूहळू कोरडे, फाटलेले आणि काळे होऊ शकतात. जर तुम्ही दररोज लिपस्टिक लावली तर कालांतराने तुमचे ओठ त्यांचा नैसर्गिक गुलाबीपणा गमावून बसतात.

लिपस्टिकमध्ये पॅराबेन्स, कॅडमियम आणि क्रोमियम सारखी अनेक प्रकारची रसायने असतात, जी शरीरात हळूहळू विषबाधा निर्माण करू शकतात. या घटकांमुळे कर्करोगासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. लिपस्टिकच्या सतत संपर्कात राहिल्याने हे विषारी पदार्थ शरीरात जमा होऊ शकतात.

लिपस्टिकमध्ये असलेल्या रसायनांमुळे काही लोकांना ओठांवर ॲलर्जी, खाज सुटणे आणि जळजळ होण्याची शक्यता असते. विशेषतः जर तुम्ही स्वस्त किंवा लोकल शॉपमधून घेतलेली लिपस्टिक वापरत असाल तर त्यामुळे त्वचेचा संसर्ग देखील होऊ शकतो.

तुम्ही लिपस्टिक लावता तेव्हा ती दिवसभर हळूहळू तुमच्या पोटात जात असते. लिपस्टिकमधील हानिकारक रसायने खाताना आणि पिताना पोटात जातात. त्यामुळे यकृत आणि पोटाला नुकसान पोहोचवू शकतात, ज्यामुळे पचनसंस्था कमकुवत होऊ शकते.

**काय काळजी घ्यावी?**

नैसर्गिक गोष्टींपासून बनलेली आणि हर्बल लिपस्टिक वापरा. लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांवर लिप बाम किंवा खोबरेल तेल लावा. झोपण्यापूर्वी ओठांवर लावेली लिपस्टिक पूर्णपणे स्वच्छ करा जेणेकरून रसायने ओठांवर राहणार नाहीत. दररोज लिपस्टिक लावणे टाळा आणि कधीकधी नैसर्गिक लूक द्या. कारण त्यातही आता वेगवेगळे रंग येतात. त्यामुळे लिपस्टिक लावण्यापेक्षा तुम्ही तेही लावू शकता. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# निर्माल्य रथ

देवपूजेचे निर्माल्य
फेकू नये नदीत
जमा करून ठेवावे
टाका शेतामध्ये मातीत..

जल प्रदुषणाला तर
बसेलच आळा
शेतीचा पोत ही सुधरेल
हा नियम पाळा ..!

पुजेच्या निर्माल्याचे
करण्या योग्य विसर्जन
निर्माल्य रथाची संकल्पना
गावात राबवू या सर्वजण..!

# मुरबाडमध्ये बोगस मतदार शोधण्याचे तहसीलदारांचे आदेश

## ग्रामसभांमध्ये होणार मतदार याद्यांचे वाचन

**बदलापूर, दि. ३ : प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यात सदोष मतदार याद्यांच्या गोंधळ वाढला असल्याने प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. त्यामुळे तालुक्यामधील प्रत्येक गावागावात ग्रामसभा घेऊन मतदार याद्यांचे वाचन करावे असे आदेश मुरबाडचे तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी पंचायत समितीला दिले आहेत. यामुळे बोगस मतदार शोधण्याचे काम सुलभ होणार असून काही मृत, दुबार मतदारांची नावे ग्रामस्थांना कळणार आहेत. याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश तहसीलदाराने दिले आहेत.

काही दिवसांपूर्वी काँगेसचे नेते राहुल गांधी यांनी मतचोरी होत असल्याची निवडणूक आयोगाविरूद्ध मोठी मोहिम हाती घेतली आहे. याच विषयावर यात्रा काढत आहेत. यापूर्वीही अनेक वेळा राहूल गाधी यांनी महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर विविध मतदारसंघांमध्ये मतदानाच्या दिवसाबाबत आणि मतदार यादीबाबत तक्रारी समोर आल्या होत्या.

अलीकडेच तालुक्यातील विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर बोगस नावे समाविष्ट झाल्याची तक्रार केली होती. अनेक मृत व्यक्तींची नावे अद्याप यादीत असल्याचे, तर काही जण कायमचे गाव सोडून गेले तरीही त्यांची नावे यादीतून वगळलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. येत्या निवडणुकांमध्ये बोगस मतदानाची शक्यता वाढल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लीडरशिप अ‍ॅवॉर्ड'


**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नुकताच 'एनर्जी लीडरशिप अ‍ॅवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने मा. लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे.

प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल मा. लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप अ‍ॅवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे मा. लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवाशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे.



अक्षय्य ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी महावितरण करत आहे.

शेतकऱ्यांना हक्काची सिंचन व्यवस्था मिळण्यासाठी शेतात सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात सर्वाधिक पंप बसविले आहेत.

# भिवंडी पालिका प्रभाग रचना जाहीर

**भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजायला सुरवात झाली आहे.त्यासाठी अनेकांनी आपापल्या प्रभागात मोर्चेबांधणी करण्यात गुंतले असताना भिवंडी पालिका निवडणूक विभागाकडून प्रभाग रचना बनविण्यात आली आहे.भिवंडी पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २०११ मधील लोकसंख्या लक्षात घेऊन २०१७ मधील प्रभाग रचना कायम ठेवत ९० सदस्यां साठी २३ प्रभाग रचना बनविण्यात आली आहे.३ सप्टेंबर रोजी आयुक्तांच्या मान्यतेने सहाय्यक आयुक्त ( निवडणूक ) नितीन पाटील यांनी प्रभाग रचना प्रारूप प्रसिद्ध केले आहे.२०११ च्या जनगणनेनुसार ७ लाख ९ हजार ६६५ इतकी लोकसंख्या प्रमाण मानून ही प्रभाग रचना बनविण्यात आली आहे.एकूण २३ प्रभाग असून त्यापैकी २१ प्रभाग हे चार सदस्यीय तर २ प्रभाग हे तीन सदस्यीय असणार आहेत. यामध्ये प्रभाग क्रमांक १७ मध्ये ३४,४७४ एवढी सर्वाधिक लोकसंख्या आहे तर प्रभाग क्रमांक १५ मध्ये २५९१९ इतकी सर्वाधिक कमी लोकसंख्या असणार आहे.

# विरार-अलिबाग प्रकल्पाला येणार वेग; जमीन अधिग्रहणास मान्यता

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

विरार-अलिबाग मल्टिमॉडेल मार्गिकेला महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. ही मार्गिका जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई ट्रान्स हार्बर सीलिंकसह महत्त्वाच्या आर्थिक व वाहतूक केंद्रांना जोडणार आहे. या मंजुरीमुळे प्रकल्पाच्या कामाला वेग येणार आहे. सरकारने तातडीने २२,२५० कोटी रुपये खर्चून जमीन अधिग्रहणास मान्यता दिली आहे. एकूण प्रकल्प खर्च ३७,०१३ कोटी रुपये इतका आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत आता जमीन अधिग्रहण प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे. इतर निविदा प्रक्रिया काही महिन्यांत पूर्ण केली जाईल. त्यानंतर २०२६ च्या सुरुवातीला प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. हा प्रकल्प बीओटी (बांधा-वापरा-हस्तांतरित करा) धर्तीवर हाती घेतला जाणार आहे. कारण ईपीसी निविदा प्रक्रियेमध्ये अंदाजित खर्चापेक्षा अधिक बोली आल्याने ती प्रक्रिया रद्द करण्यात आली. तसेच नवीन बीओटी संदर्भातील शासन निर्णय अद्याप जारी न झाल्याने निविदा प्रक्रिया पुढे ढकलली होती.

१२६.३ किमी लांबीची ही मार्गिका वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण आणि अलिबाग या शहरांना जोडणार आहे. याचबरोबर तो मुंबई-अहमदाबाद महामार्ग, मुंबई-आग्रा महामार्ग, कल्याण- मुरबाड महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-बंगळुरू महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग यांसारख्या राष्ट्रीय महामार्ग व एक्स्प्रेस-वे ला एकत्रित करणार आहे. यापूर्वी १७ जून २०२५ रोजी झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळाने ईपीसी पद्धतीवरील टेंडर प्रक्रिया रद्द करून हा प्रकल्प 'बिल्ड, ऑपरेट अँड ट्रान्सफर' (बीओएटी) मॉडेलवर राबवण्यास मंजुरी दिली होती.

# आझाद मैदानातील आंदोलनाची सांगता झाल्यानंतर परिस्थिती पूर्ववत करणारी स्वच्छता कार्यवाही पूर्ण

## आंदोलनकर्त्या बांधवांनी सहकार्य केल्याबद्दल महानगरपालिका प्रशासनाकडून आभार

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

आझाद मैदान आणि परिसरात आंदोलनकर्त्या बांधवांचे दिनांक २९ ऑगस्टपासून सुरू असलेल्या आंदोलनाची काल (दिनांक २ सप्टेंबर २०२५) सांगता झाली. या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सलग पाच दिवस आंदोलनकर्त्यांना नागरी सेवा-सुविधा पुरवण्यासाठी अविरतपणे प्रयत्न करण्यात आले. हजारो स्वच्छता कर्मचाऱयांच्या अविरत प्रयत्नांमुळे मैदान परिसरात निरंतर स्वच्छता राखणे शक्य झाले. आंदोलकर्त्या बांधवांच्या सुविधेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

संपूर्ण आझाद मैदान व परिसरात दिनांक २९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विविध संयंत्रे तसेच वाहनांचा वापर करत घनकचरा व्यवस्था विभागाने रस्ते स्वच्छ करण्यासाठी अविरत श्रम घेतले. पाच दिवस केलेल्या स्वच्छता मोहिमेअंतर्गत ६ मोठे कॉम्पॅक्टर, लहान ६ कॉम्पॅक्टर, कचरा वहन गाडी, प्रत्येकी दोन सक्शन आणि जेटींग संयंत्रे, १३ एससीव्ही, ५२ टॅंकर्स अशा ९६ वाहनांचा वापर दोन्ही सत्रांमध्ये करण्यात आला. आंदोलनाची सांगता झाल्यानंतर आझाद मैदान आणि महानगरपालिका परिसरात कर्मचाऱयांनी दिनांक २ सप्टेंबर रात्रीपासून दिनांक ३ सप्टेंबरच्या पहाटेपर्यंत अविरतपणे स्वच्छता करून संपूर्ण परिसर पूर्ववत केला.




पहिल्या दिवसापासूनच आंदोलनकर्त्यांच्या सुविधेसाठी तीन ठिकाणी फिरती (मोबाईल) शौचालये उपलब्ध करून देण्यात आली होती. पाच दिवसांच्या कालावधीत एकूण ४५० फिरती (पोर्टेबल) शौचालये आंदोलनकर्त्यांच्या वापरासाठी महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली होती. तसेच कचरा संकलनासाठी सुमारे ५०० किलो इतक्या थैल्या (डस्टबिन बॅग) देण्यात आल्या होत्या. आंदोलनकर्त्या बांधवांनीही या थैल्यांचा वापर करून कचरा संकलनासाठी सहकार्य केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून दिनांक २९ ऑगस्ट २०२५ ते २ सप्टेंबर २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात कचऱयाचे संकलन आणि वहन करण्यात आले. स्वच्छता मोहिमेमध्ये सहकार्य करण्यासाठी मोर्चेकऱयांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत फक्त सहकार्यच नव्हे तर थेट सहभाग घेवून मोठ्या प्रमाणात आंदोलनकर्त्या बांधवांनी स्वच्छता मोहिमेत हातभार लावला. या सहकार्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

आझाद मैदान आणि परिसरात स्वच्छतेच्या अनुषंगाने जंतूनाशक १०० किलो भुकटी तसेच १०५० किलो ब्लिचिंग भुकटी फवारणी करण्यात आली.

डासांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आणि कीटक नियंत्रणासाठी दोन्ही सत्रांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कीटक नाशक विभागाचा चमू कार्यरत होता. या चमूद्वारे सातत्याने धूम्रफवारणी, जंतूनाशक फवारणी संपूर्ण परिसरात करण्यात आली.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून आझाद मैदान परिसरात २४ तास वैद्यकीय कक्ष कार्यरत होता. या वैद्यकीय कक्षामध्ये अखंड कार्यरत चमू उपलब्ध करून देण्यात आले होते. या चमूच्या माध्यमातून हजारो आंदोलनकर्त्या बांधवांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. पाच दिवसांच्या कालावधीत १० हजारांहून अधिक आंदोलनकर्त्या बांधवांनी वैद्यकीय सुविधेचा वापर केला.

# 'पुणे-लोणावळा' रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गिका प्रकल्पाला मंत्रीमंडळाची मान्यता

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

पुणे ते लोणावळा दरम्यान उपनगरीय रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गाच्या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या आर्थिक सहभागाला राज्यमंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागला आहे.

मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत सादर करण्यात आलेल्या या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ५ हजार १०० कोटी रुपये असून त्यामध्ये जमीन अधिग्रहण खर्चाचाही समावेश आहे. यातील ५०:५० टक्के आर्थिक सहभागाची जबाबदारी केंद्रसरकार व राज्यशासन उचलणार आहेत. राज्य शासनाचा एकूण वाटा २ हजार ५५० कोटी रुपये इतका निश्चित करण्यात आला आहे.

राज्य शासनाच्या हिस्स्यातील या २ हजार ५५० कोटींपैकी पुणे महानगरपालिका (२० टक्के) ५१० कोटी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (२० टक्के ) : ५१० कोटी, पीएमआरडीए (३० टक्के) ७६५ कोटी असा स्थानिक संस्थांचा सहभाग राहणार असून उर्वरित रक्कम राज्य शासन देणार आहे. या निर्णयामुळे पुणे-लोणावळा रेल्वे प्रवाशांचा वाढता ताण कमी होऊन उपनगरीय रेल्वे सेवांची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. तसेच, पुणे-मुंबई या दोन महानगरांतील दळणवळण अधिक सुलभ आणि वेगवान होण्यास मोठा हातभार लागणार आहे.

# पुणे मेट्रो टप्पा - 2 मध्ये बालाजीनगर, बिबवेवाडी ही दोन नवीन स्थानके

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या विस्तारित मार्गावर स्वारगेट ते कात्रज या कॉरिडॉरवर दोन नवीन स्थानके उभारण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. बालाजीनगर व बिबेवाडी येथे ही दोन मेट्रो स्थानके उभारली जाणार असून त्यासाठी येणाऱ्या ६८३.११ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या विस्तारित मार्गावर स्वारगेट ते कात्रज या कॉरिडॉरवर दोन नवीन स्थानके उभारण्याच्या निर्णयामुळे पुणे शहरातील दक्षिण भागातील नागरिकांसाठी मेट्रो प्रवास अधिक सुलभ होणार असून वाहतूक कोंडी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे.

या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेचा २२७.४२ कोटी रुपये, 'ईआयबी'चे द्वीपक्षीय कर्ज ३४१.१३ कोटी रुपये, तर राज्य करांसाठी राज्य शासनाचे दुय्यम कर्ज ४५.७५ कोटी रुपये व व्याज रक्कमा राज्य शासनाचे अतिरिक्त बिनव्याजी दुय्यम कर्ज ६८.८१ कोटी रुपये अशा मिळून एकूण ६८३.११ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे पुणे मेट्रो टप्पा-२ चा विस्तार अधिक कार्यक्षम होऊन पुणेकरांना आधुनिक, जलद आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळणार आहे.

## आज का अंदाज

गुरूवार ४ सप्टेंबर २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ८ | ९ | २ | ३ | ६ | ७ |
| १४७ | १६८ | ४७७ | २८९ | ११० | ५९९ | ५५६ | १२४ |
| ३९० | ३४८ | ५५८ | ४७८ | २०० | ३५५ | ८८० | ४६७ |
| २०० | ७८० | ३७८ | ३६० | ३४५ | ४४५ | ४४८ | ३४० |
| २४ | ५४ | ८१ | ९१ | २१ | ३१ | ६८ | ७८ |
| २६ | ५६ | ८३ | ९३ | २९ | ३९ | ६० | ७० |
| २० | ५० | ८७ | ९७ | २५ | ३५ | ६४ | ७४ |

**४ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ५१ | ४६ | ७६ |
| ३० | ५० | ४९ | ७९ |
| ३८ | ५८ | ४२ | ७२ |
| ६७९ | ५९९ | १५० | ४५० |
| ५८९ | ७७९ | २६८ | १४४ |
| ४९९ | ३४६ | ७९० | २७० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ ९ ० १ २

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# यूकेतील गायिका रमीत संधूने ला दिला निरोप, आठवणी आणि शिकवण घेऊन केल यात्रा



**मुंबई, ३ सप्टेंबर :** झी टीव्हीवरील छोरियाँ चली गाँव हा रिॲलिटी शो देशभरात प्रेक्षकांची मने जिंकत आहे. बमुलिया गावातील साध्या पण कठीण जीवनाशी जुळवून घेण्याचा मुलींचा प्रवास या शोमध्ये दाखवला जातो. या आठवड्यात प्रेक्षकांनी भावनिक क्षण पाहिला, जेव्हा यूकेमधील गायिका स्पर्धक रमीत संधूने शोला निरोप दिला. हा अनुभव तिच्यासाठी मोठा धडा आणि गोड आठवण बनला. रमीतचा प्रवास तिच्या चिकाटी आणि सौंदर्यासाठी कायम लक्षात राहील. पहिल्या टास्कची विजेती अंजुम फकीह हिने तिला पहिली नामांकित स्पर्धक म्हणून निवडले होते. त्यानंतर सुरुवातीलाच आलेला शेणाचा प्रसंगही तिला सहन करावा लागला. पण त्याने स्वतःला परिभाषित होऊ न देता रमीतने त्याचाच टर्निंग पॉइंट केला आणि प्रत्येक आव्हानासोबत ती अधिक मजबूत होत गेली. तिच्या व्यक्तिमत्त्वामुळे गावाच्या साध्या वातावरणातही एक रंगत आली. सलून स्टायलिंगसारख्या टास्कमध्ये तिने दाखवलेली झळाळी, ट्रॅक्टर चालवताना दाखवलेली मेहनत, रसोईत स्वयंपाक करताना केलेली जुळवाजुळव, आणि कुस्तीमध्ये दिलेला उत्तम प्रयत्न या सगळ्यामुळे तिने शोवर आपली अविस्मरणीय छाप सोडली. यूकेमधून आलेली रमीत गावातील जीवन मनापासून, ऊबदारपणे आणि ठाम निर्धाराने स्वीकारत गेली, आणि त्यामुळेच ती सर्वांच्या मनात घर करून गेली. आपल्या प्रवासाबद्दल बोलताना रमीत संधू म्हणाली, छोरियाँ चली गाँव माझ्यासाठी खरंच आयुष्य बदलून टाकणारा अनुभव ठरला. जेव्हा मी पहिल्यांदा बमुलिया गावात आले, तेव्हा मला खरं तर काहीच माहिती नव्हतं की पुढे काय होईल. पहिलीच नामांकित स्पर्धक होणे आणि सुरुवातीलाच माझ्यावर शेण टाकले जाणे हे सोपे नव्हते. त्या क्षणी मी हादरले होते, पण हाच क्षण माझ्यासाठी ताकद देणारा ठरला, ज्यामुळे मी पुढची प्रत्येक गोष्ट धैर्याने सामोरी गेले.

## राशीभविष्य

**मेष :** आज आपल्या जोडीदारासोबत चांगला वेळ घालवाल. भूतकाळावर जास्त चर्चा करू नका. तसेच नात्यात कटुता येईल, अशा कोणत्याही गोष्टीचा उल्लेख करु नका. करिअरमध्ये कामाचा ताण जाणवेल.

**वृषभ :** आर्थिक बाबींमध्ये विचारपूर्वक निर्णय घ्या. संशोधन न करता गुंतवणूक करु नका, अन्यथा नुकसान होऊ शकते. तुमचे उत्पन्न वाढवण्यासाठी नवीन पर्याय शोधा. यामुळे तुमची आर्थिक स्थिती सुधारेल.

**मिथुन :** कोणतीही व्यावसायिक डील साइन करण्यापूर्वी, कागदपत्रे नीट वाचा, अन्यथा नुकसान होऊ शकते. आज स्वत: ची विशेष काळजी घ्या. विचारपूर्वक पैसे खर्च करा.

**कर्क :** जीवनात आज मोठे बदल होऊ शकतात. व्यावसायिक जीवनात नवीन संधी मिळतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. कायदेशीर बाबींमध्ये तुम्हाला विजय मिळेल.

**सिंह :** आजचा दिवस शुभ आहे. तुमची सर्व स्वप्ने पूर्ण होतील. थांबलेली कामे पुन्हा सुरू होतील. कौटुंबिक जीवनात सुख-शांती कायम राहील. आरोग्य चांगले राहील. ऑफिसमध्ये तुमची कामगिरी उत्कृष्ट राहील.

**कन्या :** आज महत्त्वपूर्ण कामांची जबाबदारी मिळेल. दिवस आनंददायी असेल. कौटुंबिक जीवनात सुख मिळेल. सामाजिक कार्यात आवड निर्माण होईल. व्यावसायिक जीवनात चांगले परिणाम मिळतील.

**तुळ :** तुम्ही कुटुंबासोबत सहलीची योजना बनवू शकता. आज तुम्हाला कुटुंबाचा पाठिंबा मिळेल. करिअरमधील अडथळ्यांपासून मुक्ती मिळेल. प्रेम जीवनात रोमान्स वाढेल.

**वृश्चिक :** दिवस सामान्य आहे. ऑफिसमध्ये तुम्हाला नवीन कामाची जबाबदारी मिळेल. शैक्षणिक कामात नवीन यश मिळेल. तुम्ही कुटुंब किंवा मित्रांसोबत कुठेतरी जाण्याचा विचार करू शकता.


**धनु :** तुमच्या जीवनात ऊर्जा आणि उत्साह भरलेला असेल. उत्पन्नाच्या नवीन स्रोतांद्वारे तुम्हाला पैसे मिळतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुणालाही उसणवार देवू नका.

**मकर :** आर्थिक बाबतीत सावध रहा. विचारपूर्वक पैसे खर्च करा. नोकरी आणि व्यवसायात कोणावरही आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. प्रेम जीवनात, आपल्या जोडीदाराच्या गोपनीयतेची काळजी घ्या.

**कुंभ :** आजचा दिवस वरदानासारखा आहे. आज तुमचे ऑफिसमध्ये, घरात नेतृत्वाच्या कौशल्याचे कौतुक होईल. आज पैसे मिळण्याचीही शक्यता आहे. भौतिक सुखसोयी वाढतील.

**मीन :** तुम्ही तुमच्या प्रेम जीवनातील क्षणांचा आनंद घ्याल.व्यावसायिक जीवन चांगले राहील. नोकरीत प्रमोशन होईल. तसेच पगारही वाढेल. जोडीदाराच्या मदतीने तुमची अधिक प्रगती होईल

## शब्दकोडे क्रमांक २२१०




**आडवे शब्द :-**
१) तुरुंग
६) लिहिण्यावाचण्याची क्षमता
११) मऊ
१२) रुची
१४) लांबचा आप्तसंबंध
१६) एक जुनी लेखणी
१८) अकारण
१९) वाकणे, वाकण्याची क्रिया
२०) पर्जन्य
२१) कौतुक
२४) अस्वस्थता, तडफड
२६) बारा वर्षांचा काळ
२८) एक पर्वत
३०) उपभोगण्यास अयोग्य
३१) मिंधा
३२) संरक्षक भिंत
३३) विरोध
३५) आठवण
३६) मीठ
३८) चांदी
४०) म गांधीजींचे नाव
४३) रागीट
४५) ओटा, कट्टा
४७) वीरमरण
४९) सोपा, उसाच्या चरकाचे वरचे तकट
५१) वाळपट
५२) मोजकेपणा, मितता
५४) गावातील जुनी वस्ती
५६) रक्कम
५८) पाणी
५९) हिंदीत धडा
६०) अंगमेहनत
६५) दुर्दशा
६३) मोठ्ठी गंमत, मौज
६४) बांबू
६५) दह्याचे पातळसर पेय
६६) दमणे
६८) डोंगर
६९) चित्रपटाचा पडदा
७२) हिंदीत शपथ
७३) गाणे
७४) अपशकुन
७६) रणांगण
७७) दृष्टी
७८) किंवा
७९) सैन्यदल

**उभे शब्द :-**
१) बेलाशक, बेफिकीरपणे
२) पुरुष
३) उचल्या, भुरट्टेचोर
४) टिंगल
५) मांडणी
७) जैन साधू
८) दांत
९) राजा हरिश्चंद्राची पत्नी
१०) घर
१३) वकिलाचे काम
१५) रम्य
१७) ललाट
१८) विसराळू
२२) कोळशाचे दुकान
२३) उणीव
२५) भ्रमर
२७) पळून जाणे
२९) केसांची बट
३३) तडीपार
३४) तरतूद
३५) च्या बरोबर
३७) चाटून खाण्याचे (औषध)
३९) होडी
४०) मुक्ता, शिंपल्यातील रत्न
४१) काकुळतेने याचना करणे
४२) मनाला टोचणारे दुःख
४४) उच्च, श्रेष्ठ
४६) चंद्र
४८) कल्ला, गडबड
५०) प्राणान्तिक वेदना
५३) दुसरा, अन्य
५५) प्रभात
५७) श्रम, मेहनत
५९) पूर्ण ऐक्य,
६१) छिद्र
६३) कोथिंबीरीचे बी
६४) काठ, बाजू
६५) थाळी
६७) वाळवी
६८) प्रस्थान करणे
७०) पडदा
७१) वाळा
७२) न्यून
७३) शीतल
७५) किंमत

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## महत्त्वाचे

### मनमाडच्या राय कॉलनीत बाल गणेश भक्तांकडून श्रींची स्थापना

**मनमाड ।** सध्या गणेशोत्सवाची धूम सर्वत्र सुरू असून मनमाड शहरात देखील गणरायाच्या आगमन उत्साह वातावरणात झाले. शहरातील गल्लोगल्लीत देखील बाल गणेश भक्तांनी गणेश मंडळ स्थापन करून श्री गणरायाचे स्थापना केली आहे. मनमाड शहरातील एफसीआय रोड येथे



असलेल्या राय कॉलनीमध्ये लहान गणेश भक्त एकत्र येत बाल गणेश मित्र मंडळाची स्थापना करुन श्री गणरायाचे भक्तीभावाने व मनोभावे स्थापना केले. दररोज सकाळी व सायंकाळी बालगणेश भक्त मनोभावे पुजा व आरती करतात. यामुळे परिसरात आनंदमय वातावरण असते. या गणेश मंडळाचे यंदा ३ रे वर्ष आहे. या मंडळामध्ये राय कॉलीनीतील आरुष राय, शिवांश पाटील, सोहम वनवे, ईशान राय, स्वराज गोडसे,श्लोक देवकाते, ऋषभ वनवे,अंश राय, सियल आदि बाल गणेशभक्त सहभागी आहे. गेल्या काही वर्षापासून शहरात श्री गणरायाची मोठ्या मुर्त्या बसवण्याची परंपरा सुरू झाली आहे. शक्यतो गणेशोत्सव काळात शाडू मातीच्या मूर्ती सर्वांनी स्थापन केले पाहिजे, असे बालगणेश भक्तांनी आमचे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

### इंदिराताई हिरे यांचे निधन

**मालेगाव ।** राज्याचे माजी शिक्षणमंत्री स्वर्गीय डॉ. बळीराम हिरे यांच्या सुविद्य पत्नी आणि भाजपचे नेते प्रसाद हिरे यांच्या मातोश्री इंदिराताई बळीराम हिरे (वय ८६) यांचे निधन



झाले. त्यांच्या पश्चात चिरंजीव प्रसाद हिरे, कन्या डॉ.सुचेता बच्छाव, डॉ. नीता शुक्ल, सुन गीतांजली हिरे, नातू प्रणव, नात प्रांजली असा परिवार आहे. इंदिराताई हिरे ह्या इंदिरा महिला सहकारी बँकेच्या आणि इंदिरा महिला पतसंस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा होत्या. महिलांनी महिलांच्या विकासासाठी, स्वावलंबनासाठी त्यांनी ह्या बँकेची स्थापना केली. कै. भाऊसाहेब हिरे स्मरणिका समितीच्या त्या संस्थापक विश्वस्त होत्या.

# मनमाडला फटाक्यांच्या आतिषबाजीत आनंदोत्सव

**मनमाड ।** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई येथील सहा दिवसांच्या उपोषणानंतर शासनाने मराठा समाजाच्या बहुतेक मागण्या मान्य केल्या. त्यानंतर जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. आंदोलनला यश मिळाल्याबद्दल मनमाड शहर सकल मराठा समाज बांधव तसेच शिवसेना शिंदे गटातर्फे येथील छत्रपती शिवाजी महार-ाज पुतळ्याजवळ सायंकाळी फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य जल्लोष व आनंदोत्सव साजरा झाला.

यावेळी उत्साही मराठा समाज बांधव तसेच शिवसैनिकांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जरांगे पाटलांचा विजय असो आदींसह विविध घो-षणा देत छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर घोषणा देत, नाचत पेढे वाटून व फटाक्यांच्या आतषबाजीत सुमारे एक तास हा साजरा केला. समाज बांधवांच्या उत्साहाला उधाण आले होते. जरांगे पाटील यांचा विजय



असो यासह विविध घोषणांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर दणाणून गेला. विविध पक्ष, कार्यकर्त्यांसह मराठा समाज बांधव सहभागी झाले. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर व आंदोलनानंतर अखेर सकल मराठा समाजाचे नेते जरांगे पाटील यांच्या उपोषणाला यश आले. राज्य शासनानेही या उपोषणाची तातडीने योग्य ती दखल घेत समाजाच्या मागण्या मान्य केल्या त्याबद्दल येथील मराठा समाजाचे प्रतिनिधी व शिवसेना शहरप्रमुख मयुर बोरसे यांनी राज्य शासनाचे व मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. यावेळी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख फरहान खान, माजी आमदार राजेंद्र देशमुख, माजी नगराध्यक्ष साईनाथ गिडगे, योगेश पाटील, सुनील हांडगे, नाना शिंदे, संजय कटारिया, स्वाती मगर, नितीन पाटील, योगेश जाधव, विठ्ठल नलावडे, पिंटू शिरसाठ, परेश राऊत, प्रमोद पाचोरकर, निलेश व्यवहारे, पप्पू परब, ललित रसाळ, अनिल देवरे आदींसह समाजबांधव व शिवसैनिक उपस्थित होते.

# कळवणला जगदगुरुपूजन सोहळा, गणेश महाआरती





**ओझर ।** जगदगुरू जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांच्या कृपाशिर्वादाने उत्तराधिकारी जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत, कळवण येथे श्री श्री १००८ महामंडलेश्वर मित्र मंडळ यांच्यावतीने स्वामी शांतीगिरीजी महाराज यांचा भव्य पूजन सोहळा व श्री गणेशाची महाआरती उत्साहात पार पडली.

कळवण येथील श्री श्री १००८ महामंडलेश्वर मित्र मंडळाच्या वतीने अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचा पूजन सोहळा व गणेशोत्सवा निमित्त श्री गणेशाची महाआरती सोहळा मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी जगदगुरु श्री बाबाजींच्या पवित्र पालखीची लक्षवेधी मिरवणुक संपन्न झाली. मिरवणुकीत भाविकांनी हजारोंच्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमस्थळी जगदगुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांचे आगमन होताच जोरदार आतिषबाजी करण्यात आली.पुष्पवृष्टी करून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी जय बाबाजींच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. या सोहळ्याच्या निमित्ताने भाविकांसाठी सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितीत हजारो भाविकांनी महाप्रसादाचा व दर्शनाचा लाभ घेतला.

## इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गणपती बाप्पाचे विसर्जन



**वणी ।** वणी येथील आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी गणपती बाप्पाचे विसर्जन उत्साहात व प्रदूषणमुक्त पद्धतीने करण्यात आले. पर्यावरण संवेदनशीलतेचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सहभागातून यशस्वीपणे राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका एस. डी. काळे, शिक्षकवृंद व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम गणपती बाप्पाची आरती करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गणपती गीतांवर सामूहिक नृत्य सादर करून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांना शाडूमातीच्या गणेशमूर्तींचे पूजन आणि प्रदूषणमुक्त विसर्जनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. पर्यावरणपूरकतेचा संदेश देताना विद्यार्थ्यांनी स्टीलच्या पंचपात्रीची फुलांनी सजावट केली आणि शाडूमातीपासून बनवलेल्या गणेशमूर्तींचे त्याच पंचपात्रात विसर्जन करण्यात आले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी हा विसर्जन सोहळा पार पाडला. ढोल ताशांच्या गजरात व आनंदाच्या वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला. या उपक्रमातून पर्यावरणाचे महत्त्व, पारंपरिक मूल्ये व सृजनशीलता यांचा संगम साधत शाळेने एक आदर्श पद्धत सर्वांसमोर मांडली.

## नासाका माध्यमिक विद्यालयात गणपतीचे पर्यावरणपूरक विसर्जन

नाशिकरोड:- पळसे येथील नाशिक सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात पाच दिवसांच्या गणेशाचे पर्यावरणपूरक विसर्जन करण्यात आले.

विद्यालयात शाडू मातीपासून गणपती तयार करण्याच्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी गणेशाच्या मूर्ती साकारल्या. त्यानंतर विद्यालयात गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. नासाकाचे अवसायक प्रदीप आव्हाड, मानद व्यवस्थापक सुधाकर गोडसे, मुख्याध्यापक अरुण पगार आणि शिक्षक-कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली पाच दिवस विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी आरतीसह प्रसादाचे नियोजन केले. विसर्जनावेळी गणेशाचे ढोलताशांच्या गजरात मिरवणुकीने विसर्जनस्थळी आगमन झाले. विद्यार्थ्यांनी 'एक-दोन-तीन-चार, गणपतीचा जयजयकार!' अशासारख्या घोषणा देत वातावरणात चैतन्य निर्माण केले. तेथे पूजाअर्चा करून कृत्रिम तलावात गणपतीचे विसर्जन करून झाडांना निर्माल्य टाकण्यात आले. विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.




## नाशिक गणेश दर्शन...



ध्रुव गुजर, दक्ष गुजर



प्रा. कांचन शेजवळ, अंबिकानगर, सिडको



शितल कुंभळे



कल्याणी धोंडगे



कु. क्षितिजा दीपक भावसार, कामटवाडे, नाशिक



कु. काव्या शेजवळ, अंबिकानगर, सिडको



धनश्री ईपर, दिव्या वाघ



सोनाली ठाकरे, सटाणा



सोनाली बाळासाहेब बागुल जगदंबानगर, कसबे वणी



लता अजय वाघ



ऋतुजा आणि आकाश भावसार, सिडको, नाशिक



काजल टर्ले



ऋतिका उदावंत



शितल थेपे




# कर्करोगाचा धोका कमी करणे शक्य

पूर्वी प्रौढांना कर्करोगाचा धोका जास्त असायचा; पण आज सर्वांनाच त्याचा धोका आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे, की शरीरासाठी जीवनसत्त्वे आवश्यक आहेत; परंतु अलिकडच्या एका मोठ्या संशोधनातून हे स्पष्ट झाले आहे, की विशिष्ट जीवनसत्त्वाचा डोस कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करू शकतो. व्हिटॅमिन डी हे ते जीवनसत्व आहे. व्हिटॅमिन डी २ आणि व्हिटॅमिन डी ३ हे त्याचे दोन प्रकार आहेत.




घ्या काळजी

डॉ.सतीश सोनवणे

**व्हिटॅमिन डी २ आणि डी ३ मध्ये काय फरक?**

व्हिटॅमिन डी २ बहुतेकदा मानवांनी बनवले जाते आणि अन्नात जोडले जाते. दुसरीकडे, व्हिटॅमिन डी ३ आपल्या त्वचेत सूर्यप्रकाशापासून बनवले जाते आणि मासे, अंडी यांसारख्या प्राण्यांपासून बनवलेल्या अन्नातदेखील आढळते. संशोधनात वारंवार सिद्ध झाले आहे की व्हिटॅमिन डी ३ शरीरात व्हिटॅमिन डीची पातळी वाढवण्यासाठी डी २ पेक्षा अधिक प्रभावी आहे.

**संशोधनात काय आढळले?**

'केएसआर'मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घेतल्याने प्रौढांमध्ये मृत्यूचा धोका कमी होतो का यावर अलिकडच्या एका मोठ्या अभ्यासात लक्ष देण्यात आले. यासाठी ५२ जुन्या अभ्यासांचा आढावा घेण्यात आला. त्यात ७५ हजारांहून अधिक लोकांचा समावेश होता. निकालात आढळून आले, की व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घेतल्याने सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका कमी होत नाही. हृदयरोगामुळे होणारे मृत्यू, हृदयरोगाव्यतिरिक्त इतर कोणत्याही आजाराने होणारे मृत्यू कवा कर्करोगाव्यतिरिक्त इतर मृत्यूच्या बाबतीत कोणताही महत्त्वाचा फरक दिसून आला नाही.

**मृत्यूचा धोका कमी झाला**

कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या कमी झाला. संशोधनानुसार, व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घेतल्याने कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका सुमारे १६ टक्क्यांनी कमी झाला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्हिटॅमिन डी ३ घेणाऱ्यांमध्ये डी २ घेणाऱ्यांपेक्षा सर्व कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूचा धोका खूपच कमी असल्याचे आढळून आले. संशोधकांचे म्हणणे आहे की केवळ व्हिटॅमिन डी ३ घेतल्याने एकूण मृत्यूचा धोका कमी होईल असे म्हणणे अकाली ठरेल; परंतु हे स्पष्ट आहे, की ते कर्करोगामुळे मृत्यूचा धोका कमी होतो. या कारणास्तव, शास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणात अधिक अभ्यास करण्याचा सल्ला देत आहेत.

**व्हिटॅमिन डी महत्त्वाचे का आहे?**

व्हिटॅमिन डी केवळ हाडे आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठीच महत्त्वाचे नाही, तर ते अनेक गंभीर आजारांना प्रतिबंधित करण्यासदेखील मदत करू शकते. त्याच्या कमतरतेमुळे थकवा, स्नायू दुखणे, हाडे कमकुवत होणे आणि वारंवार आजार होऊ शकतात. जर तुम्हाला तुमच्या आहारातून कवा पूरक आहारातून पुरेसे व्हिटॅमिन डी, विशेषतः डी मिळत असेल, तर दीर्घायुष्य आणि चांगल्या आरोग्यासाठी हा एक चांगला मार्ग असू शकतो.

# पित्ताशयातील खड्यांची समस्या

अनेकदा पोटात तीक्ष्ण कवा तीव्र वेदना जाणवत असतील, तर फक्त गॅस कवा अपचन आहे असे समजून त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. कधीकधी ही वेदना शरीरात लपलेल्या गंभीर समस्येचे लक्षण असते. विशेषतः जर वेदना पोटाच्या वरच्या उजव्या भागात असेल, पाठीवर कवा खांद्यावर पसरत असेल आणि खाल्ल्यानंतर अधिक वाढत असेल, तर ती पित्ताशयाच्या दगडाचे लक्षण असू शकते.

पित्ताशयाच्या खड्यांच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये पोटाच्या वरच्या उजव्या भागात वेदना सर्वात सामान्य जाणवते. ही वेदना कधी कधी छाती, पाठ कवा उजव्या खांद्यावर पसरू शकते. जड कवा तेलकट अन्न खाल्लयानंतर वेदना जास्त वाढते. काही प्रकरणांमध्ये, रुग्णाला मळमळ, उलट्या आणि अपचन देखील होऊ शकते.

**पित्ताशयाच्या खड्यांची मुख्य लक्षणे**


*पोटाच्या वरच्या उजव्या भागात तीव्र वेदना
*मागे कवा खांद्यापर्यंत पसरणाऱ्या वेदना
*मळमळ आणि उलट्या
*अपचन आणि पोटफुगी
*ताप आणि थंडी वाजून येणे

**पित्ताशय खड्यांची कारणे**

*उच्च कोलेस्टेरॉल
*लठ्ठपणा येणे
*हार्मोनल बदल
*तेलकट आणि मसालेदार अन्नाचे जास्त सेवन
*फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले अन्न सेवन
*निर्जलीकरण आणि दीर्घकाळ उपवास

**चाचण्या आणि उपचार**

ही लक्षणे जाणवत असतील तर उशीर करू नका आणि ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा. अल्ट्रासाऊंड ही पित्ताशयाच्या खड्यांची पुष्टी करण्यासाठी सर्वात सोपी आणि अचूक चाचणी आहे.



व्याधी विचार

डॉ. महेश दळे

**उपचार**

सुरुवातीच्या टप्प्यात आहार नियंत्रण आणि औषधे आराम देऊ शकतात; परंतु मोठ्या कवा जास्त खड्यांसाठी, शस्त्रक्रिया (लॅपरोस्कोपिक कोलेसिस्टेक्टोमी) हा शेवटचा पर्याय आहे


**प्रतिबंधात्मक उपाय**

*तेल आणि चरबीयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा
*नियमित व्यायाम करा, पुरेसे पाणी प्या
*फळे, भाज्या आणि फायबरयुक्त आहार घ्या
*जास्त वेळ उपाशी राहू नका

पोटाच्या वरच्या उजव्या भागात वारंवार वेदना होत असतील तर ताबडतोब अल्ट्रासाऊंड करा आणि योग्य उपचार सुरू करा. वेळेवर तपासणी आणि उपचार केल्याने वेदना कमी होतातच, शिवाय मोठ्या गुंतागुंती टाळता येतात.

# पर्याय मधल्या वेळच्या खाण्याचे...

वजन कमी करणं सोपं नसतं. यासाठी कमी कॅलरी खाऊन अधिक कॅलरी खर्च करणं गरजेचं असतं. म्हणूनच आपल्या आहारात कमी कॅलरीयुक्त पदार्थांचा समावेश असायला हवा. त्यातही दोन जेवणांच्या मध्ये चहाच्या वेळी आरोग्यदायी असं काही तरी खायला हवं. मधल्या वेळच्या खाण्याचे हे काही पर्याय...



काय खावं?

* सुका मेवा हा मधल्या वेळच्या खाण्याचा खूप चांगला पर्याय आहे. शेंगदाणे, चणे, बदाम, काजू, आक्रोड, बेदाणे, पिस्ते असे असंख्य पर्याय या वेळच्या खाण्यामध्ये आहेत. सध्या विविध प्रकारच्या बियाही मिळतात. या बियाही तुम्ही खाऊ शकता. सुक्या मेव्यामुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं राहील.

* चहाऐवजी उकडलेली अंडी खावीत. अंड्यांमधून तुम्हाला प्रथिनं मिळू शकतात. न्याहरीलाही उकडलेली अंडी खाता येतील.

* मधल्या वेळी प्रथिनयुक्त पदार्थ खाता येतील. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत प्रथिनांना प्रचंड महत्त्व आहे. प्रथिनांमुळे स्नायू बळकट होतात. म्हणूनच अशा पदार्थांचा समावेश आहारात करता येईल.

* तुम्ही पनीरचे पदार्थही खाऊ शकता. बाजारात मिळणाऱ्या लो फॅट पनीरचा वापर करता येईल. पनीर मर्यादित प्रमाणात खाल्ल्याने बरेच लाभ मिळतील. पनीर हा दुग्धजन्य पदार्थ असल्यामुळे भरपूर प्रथिनं मिळतील.

# स्मरणशक्ती वाढवण्यासाठी...

स्मरणशक्ती सुधारण्यासोबतच एकाग्रता वाढवायची असेल तर तुम्ही काही आयुर्वेदिक उपाय करू शकता.



आयुर्वेद आणि विकार

* मेडिटेशन म्हणजे ध्यानधारणा. मानसिक आरोग्य उत्तम राखायचं असेल तर मेडिटेशन करायला हवं. मेडिटेशनमुळे शारीरिक आरोग्यही चांगलं राहतं. दिवसभरात फक्त दहा मिनिटं मेडिटेशन केल्यामुळे बुद्धी तल्लख होते तसंच मेंदू अधिक सक्षम होतो. मेडिटेशन करताना आपण श्वसनावर लक्ष केंद्रित करतो. यामुळे एकाग्रता वाढायला मदत होते. परीक्षेच्या काळात मुलांवर खूप ताण येतो. मेडिटेशनमुळे ताण कमी होऊ शकतो.

* मेंदूला चालना देण्यासाठी अगदी सोपा उपाय करता येईल. विविध क्रिया करताना नेहमीच्या हाताऐवजी दुसऱ्या हाताचा वापर करा. उजव्या लोकांना खाण्यासाठी कवा दात घासण्यासाठी डाव्या हाताचा वापर करता येईल तर डावखुरे लोक उजव्या हाताने काही कामं करू शकतील.

* शरीरातल्या विविध अवयवांना, त्यातही मेंदूला उत्तम रक्तपुरवठा झाला की त्याचं कार्य सुधारतं. मेंदूला अधिक रक्तपुरवठा करण्यासाठी काही व्यायामप्रकार करता येतील. काही योगासनांमुळेही मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात वाढ होऊ शकते.

* शरीरासोबतच मानसिक आरोग्यावरही आपल्या आहाराचा परिणाम होत असतो. मेंदूलाही खाद्य हवं असतं.


# शास्त्रज्ञांनी ओळखला अंडाशयाचा कर्करोग

कधी कधी जीव वाचवण्याची सर्वात मोठी गुरुकिल्ली म्हणजे वेळेत रोग ओळखणे; परंतु काही आजार असे असतात, जे शांतपणे वाढत राहतात आणि समोर येतात, तेव्हा खूप उशीर झालेला असतो. अंडाशयाचा उच्च-श्रेणीचा सेरस कार्सिनोमा (एचडीएससी) हा देखील असाच एक कर्करोग आहे, जो महिलांमध्ये सर्वात प्राणघातक प्रकारांपैकी एक मानला जातो. तथापि, आता शास्त्रज्ञांनी त्याचे मूळ ओळखले आहे.

महिलांमध्ये मृत्यूच्या बाबतीत ओव्हेरियन कर्करोग सहाव्या क्रमांकावर येतो. बहुतेक महिला निदान झाल्यानंतर पाच वर्षांपेक्षा जास्त काळ जगत नाहीत. कारण असे आहे, की सुरुवातीच्या टप्प्यात त्याची लक्षणे जवळजवळ नगण्य असतात आणि त्यासाठी कोणत्याही विश्वसनीय चाचण्या नाहीत.

**कर्करोगाचे मूळ काय आहे?**

शास्त्रज्ञांना बराच काळ असा संशय आहे, की 'एचजीएससी' प्रत्यक्षात अंडाशयात नव्हे, तर फॅलोपियन ट्यूबमध्ये सुरू होते; परंतु नेमके कुठे आणि कसे, हे स्पष्ट नव्हते. कॉर्नेल विद्यापीठाचे डॉ. अलेक्झांडर निकितिन यांनी केलेल्या संशोधनातून असे दिसून आले, की फॅलोपियन ट्यूबमधील एक विशेष प्रकारची पेशी, प्री-सिलिएटेड ट्यूबल एपिथेलियल पेशी या कर्करोगाची सुरुवात करतात. या पेशी स्टेम पेशी आणि पूर्णपणे विकसित सिलीएटेड पेशींमधील संक्रमण अवस्था आहेत. कर्करोग प्री-सिलिएटेड पेशींपासून होतो. पूर्वी असे मानले जात होते, की स्टेम पेशी या कर्करोगासाठी जबाबदार आहेत; परंतु या संशोधनात शास्त्रज्ञांना असे आढळून आले, की जेव्हा कर्करोग रोखणारे दोन महत्त्वाची जनुके टीपी ५३ आणि आरबी १, स्टेम पेशींमध्ये बंद केले जातात, तेव्हा ते कर्करोगग्रस्त झाले नाहीत, तर मरतात. उलटपक्षी, प्री-सिलिएटेड पेशींमध्ये हीच जनुके बंद केली जातात, तेव्हा कर्करोग तयार होऊ लागतो.




आरोग्य तंत्रज्ञान

डॉ. कुंदन गायकवाड

# केस खाण्याची वाईट खोड

एखाद्या मुलाने स्वतःचे केस स्वतः खाल्ले तर काय होईल? हे विचित्र वाटते; पण ही एक आणि गंभीर वैद्यकीय स्थिती आहे, ज्याला 'रॅपन्झेल सड्रोम' म्हणतात. ही केवळ एक विचित्र सवय नाही तर मानसिक आणि शारीरिक आरोग्याशी संबंधित एक धोकादायक समस्या आहे, जी मुलांवर आणि कधीकधी प्रौढांवरदेखील परिणाम करू शकते.



आरोग्य सवयी

डॉ. मेघा पठारे

**समस्या का उद्भवते?**

ही समस्या मानसिक ताण, चता, राग, भावनिक आघात कवा बालपणातील कोणत्याही मानसिक परिणामामुळे होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, ती ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव्ह डिसऑर्डर (ओसीडी) चा देखील एक भाग आहे. राग आणि तणावात स्वतःला शांत करण्यासाठी, मुले केस उपटून खातात लक्षाचा अभाव, एकटेपणा कवा भावनिक दुर्लक्ष हेदेखील याचे कारण असू शकते. कधीकधी ही सवय इतकी वाढते, की मूल ते थांबवू शकत नाही.

**धोके किती गंभीर आहेत?**

* पोटदुखी आणि उलट्या होऊ शकतात
* पचनसंस्थेत अडथळा येऊ शकतो.
* वजन कमी होते आणि अशक्तपणा येऊ शकतो
* गंभीर प्रकरणांमध्ये आतड्यांतील फाटण्याचा धोका असतो, जो घातक ठरू शकतो.

**लक्षणे कशी ओळखावी?**

* वारंवार केस ओढणे
* केस चावणे कवा गिळणे
* पोटदुखी, उलट्या कवा भूक न लागण्याच्या तक्रारी
* अचानक वजन कमी होणे

**उपचार आणि प्रतिबंध**


'रॅपन्झेल सड्रोम'वर शारीरिकच नाही, तर मानसिक उपचारदेखील उपलब्ध आहेत.

**मानसिक थेरपी**

* संज्ञानात्मक वर्तणूक थेरपी (सीबीटी) समुपदेशन
* मुलाच्या भावना समजून घेणे.

# सवयी चांगल्या असल्या तरी...

निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी काही चांगल्या सवयी अंगी बाणवणं गरजेचं असतं. मात्र या चांगल्या सवयींचा अतिरेक होता कामा नये. एखादी सवय चांगली आहे म्हणून आपण तिचा अतिरेक करतो. मात्र याचे दुष्परिणाम होऊ शकतात. आपल्याकडून अजाणतेपणी या चुका घडतात. कोणत्या सवयींमुळे आपण अडचणीत येऊ शकतो? जाणून घेऊ.



कुठे चुकतो आपण?

* शरीराला जीवनसत्त्वं, खनिजं यांची खूप गरज असते. पण त्यांचं प्रमाण मर्यादित असायला हवं. गरजेपेक्षा अधिक जीवनसत्त्वं शरीरात गेल्यास बरेच दुष्परिणाम दिसून येतात. ठराविक प्रमाणापेक्षा चारपट अधिक जीवनसत्त्वांचं सेवन केल्यास कर्करोग होऊ शकतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. म्हणूनच जीवनसत्त्वांच्या गोळ्या घेताना अधिक काळजी घ्यायला हवी.

* अनेकजण दिवसातून तीन ते चार वेळा दात घासतात. मात्र ही सवय चुकीची आहे. सातत्याने दात घासत राहिल्यामुळे दातांवरचा इनॅमलचा थर कमी होतो. सततच्या दात घासण्यामुळे १० ते २० टक्के प्रौढांचे दात खराब होतात. दात घासण्यासाठी शक्यतो सौम्य टूथब्रशचा वापर करावा. दिवसभरात फक्त दोन वेळा हलक्या हातांनी दात घासावेत.

* पोटाचं आरोग्य चांगलं राखण्यासाठी तंतूमय पदार्थ म्हणजे फायबर खाण्याचा सल्ला दिला जातो. अनेकजण गरजेइतकं फायबरही खात नाहीत. मात्र फायबरचं प्रमाण अचानक वाढवल्यास गॅसेसची समस्या उद्भवू शकते. तसंच पोट फुगल्यासारखं वाटू शकतं. फायबरचं पमाण टप्प्याटप्प्याने वाढवावं. एकाच वेळी भरपूर फायबर खाऊ नये. पांढऱ्या ब्रेडऐवजी गव्हाचा ब्रेड खावा. बटाटा वेफर्सऐवजी सफरचंदाचं सेवन करावं. अशा छोट्या बदलांनी फायबरचं प्रमाण वाढवावं.

* खूप झोपणंही चुकीचं आहे. दररोज नऊ तासांपेक्षा अधिक काळ झोपणाऱ्या लोकांना भविष्यात स्मृतीभ्रंशाचा धोका निर्माण होऊ शकतो, असं काही अभ्यासांमधून समोर आलं आहे.

# उचकीचा गंभीर आजाराशी संबंध

उचकी लागली तर कोणीतरी आठवण काढत असेल असे आपण म्हणतो; परंतु वारंवार सारख्या येणाऱ्या उचकीचा संबंध गंभीर आजाराचा संकेतदेखील असू शकतो. सर्वसाधारणपणे उचकी काही मिनिटांसाठी असते आणि आपोआप ती जाते; परंतु ही उचकी ४८ तासांहून अधिक वेळ येत असेल, तर तिच्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक होऊ शकते.

**उचकी का येते ?**

संशोधनाच्या नुसार उचकी डायाफ्राम नावाच्या मांसपेशीच्या अचाकन आंकुचन पावल्याने होते. डायाफ्राम हे फुफ्फुस आणि पोटाच्या दरम्यान असते. ते श्वास घेण्यास मदत करत असते, जेव्हा ही मांसपेशी वा स्नायूपेशी अनियंत्रितपणे आकुंचन पावते, तेव्हा व्होकल कॉर्ड बंद होते आणि उचकीचा 'हिक' सारखा आवाज निर्माण होतो.

**उचकी येण्याची कारणे**

* खूप घाई-घाईत जेवणे कवा पिणे
* कार्बोनेटेड ड्रक्स आणि अल्कोहोल
* मसालेदार जेवण
* खूप हसणे कवा च्यईंगम चावणे
* ज्यादा हंसना या च्यूइंग गम चघळणे
* अचानक तापमान बदलणे

ही सर्वसामान्य कारणे उचकीला जबाबदार असतात. त्यात घाबरण्यासारखे काही नाही

**डॉक्टरांचे म्हणणे काय?**

तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते वारंवार उचकी येते आणि लवकर थांबत नाही, तेव्हा हा शरीराचा सिग्नल असू शकतो. अनेकदा गॅसेस वा जेवण गिळण्याने नाही, तर आतील एखाद्या रोगामुळे वा पेशींचे तंत्र गडबड झाल्याचेही लक्षण असू शकते. वारंवार उचकी येणे पोट कवा लिव्हर खराबीचे वा ब्रेन नर्व्हसंबंधी समस्येची सुरुवात असू शकते.



आरोग्यमंत्र

संजय मुरुमकर

**उचकी केव्हा होते खतरनाक?**

सतत ४८ तासांहून अधिक वेळ उचकी येत असेल तर त्यास 'Perrirtent "hiccup"' असे म्हटले जाते. हे एक महिने चालल्यास Inrtabtable "hiccup" म्हणतात. त्यामुळे झोप, जेवण आणि रोजचे दैनंदिन जीवन अस्थिर होऊ शकते.

**खूप काळ उचकी येण्याची कारणे**

**नर्व्ह समस्या :** वॅगस वा फ्रेनिक नर्व्हमध्ये जखम कवा सूज

**मेंदूशी संबंधित आजार :** स्ट्रोक, मेंदूचा ट्युमर, मेनजायटीस

**पचन तंत्राची गडबड :** एसिड रिफ्लक्स (जीईआरडी), अल्सर, पॅंक्रियायटिस

**लिव्हर खराब होणे**

फुप्फुस आणि हृदयाचा रोग : न्यूमोनिया, पेरिकार्डायटिस

नवसंशोधन


## सर्वात प्रभावी प्रतिजैविक!

प्रतिजैविकांमुळे बॅक्टेरियांचा नाश होतो. म्हणूनच बॅक्टेरियांमुळे उद्भवणाऱ्या व्याधींच्या निवारणासाठी प्रतिजैविकं दिली जातात. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये प्रतिजैविकांचा प्रभाव कमी होत असल्याचं दिसून आलं. अनेक बॅक्टेरिया प्रतिजैविकांना प्रतिकार करू लागले. याच कारणामुळे अनेक व्याधींवर उपचार करणं कठीण होऊन बसलं आहे. प्रतिजैविकांना प्रतिकार करणारा क्षयरोग अत्यंत घातक आजार आहे. म्हणूनच प्रतिजैविकांची क्षमता वाढवण्याची गरज आहे. याच प्रक्रियेत मैलाचा दगड ठरावा, असा शोध अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी लावला आहे. शास्त्रज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून नवं प्रतिजैविक तयार केलं आहे.




डोळ्यांचं आरोग्य

## डोळे सुजतात?



बरेचदा झोपून उठल्यानंतर डोळे सुजल्यासारखे वाटतात. डोळ्यांच्या खाली असणाऱ्या त्वचेला जडत्व आलेलं असतं. यावर बरेचदा वरवरचे उपाय केले जातात. कॉस्मेटिक उत्पादनांच्या वापरामुळे ही समस्या कमी होत नाही. त्यांचा प्रभाव तात्पुरता असतो. डोळे सुजल्यामुळे तुम्ही वयापेक्षा मोठे दिसू लागता, वार्धक्य आल्यासारखं वाटतं. डोळे जड झाल्यामुळे उत्पादकतेवर परिणाम होतो. उत्साह कमी होतो. सतत दमल्यासारखं वाटतं. अंतर्गत दोषांमुळे कवा जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे डोळे सुजल्यासारखे दिसतात. या समस्येवर आहाराद्वारे नियंत्रण मिळवता येऊ शकतं. कोरडेपणामुळे डोळे जड होतात. म्हणून भरपूर पाणी प्यावं. रसाळ फळं खावीत.

जपणूक त्वचेची

## वय वाढल्याच्या खुणा...



त्वचेचं आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी योग्य सौंदर्यप्रसाधनांची निवड करायला हवी. बाजारात असंख्य फेसवॉश मिळतात. प्रत्येकाचे गुणधर्म वेगवेगळे असतात. तजेला टिकवून ठेवण्यासाठी त्वचेच्या प्रकारानुसार फेस वॉश निवडावा. कोरडी त्वचा असणाऱ्यांनी त्वचेला ओलावा देणाऱ्या फेसवॉशची निवड करावी. त्वचा कोरडी असल्यास क्रीमी फेसवॉशचा वापर करावा. या फेसवॉशमुळे मेक अप, त्वचेतली घाण, धूळ निघून जायला मदत होईल. तेलकट त्वचेसाठी सॅलिसिस्टिक ॲसिड, कोरफड आणि टी ट्री ऑईलयुक्त फेस वॉश वापरावा. जेलयुक्त फेसवॉशचा वापर करता येईल. सर्वसामान्य त्वचा कवा दोन्ही प्रकारच्या त्वचेचं मिश्रण असेल तर अरोमायुक्त फेसवॉश वापरून बघावा.

आजीबाईचा बटवा

## लसूण रिकाम्या पोटी खाल्ल्याने...



लसणात अनेक औषधी गुणधर्म असतात. म्हणूनच रिकाम्या पोटी लसूण खायला हवा. उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी दररोज सकाळी रिकाम्या पोटी लसूण खावा. लसणामुळे हृदयाचं आरोग्य चांगलं राहतं. लसणामुळे कोलेस्टरॉल कमी व्हायला मदत होते. हृदयरोग टाळण्यासाठी लसूण खावा. मध आणि लसूण एकत्र खाल्ल्यामुळे रक्ताभिसरण सुधारतं. पोटाच्या समस्यांवरही लसूण गुणकारी आहे. गॅस, ॲसिडिटीसारख्या समस्या लसणामुळे दूर होतात. ॲसिडिटी दूर करण्यासाठी भाजलेला लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो. बद्धकोष्ठतेवरही लसूण गुणकारी आहे. पोटाच्या तक्रारी दूर करण्यासाठी सकाळी लसूण खावा. लसणात बॅक्टेरियाविरोधी आणि दाह कमी करणारे गुणधर्म असतात.

## दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'


दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...



श्री. शिवाजी पवार , अभिनंदन निवास सहकारी गृहनिर्माण संस्था, रामभाऊ भोसले मार्ग, फेरबंदर-कॉटन ग्रीन.



हरिश्चंद्र एकनाथ ठाकूर गव्हनपाडा. चेंबुर



नंदु आणि चंदु सावंत परिवार पिलवली, रत्नागिरी



शुभम बाळकृष्ण विनरेकर परीवार. डॉक्टर आंबेडकर सदन. करी रोड.



श्री. दिलीप मसुरकर, सरिता बिल्डिंग पारवरी रोड, माझगाव

# सेंसेक्समध्ये 410 तर निफ्टीत 135 अंकांची उसळी

## टाटा स्टील आणि हिंडाल्को आघाडीवर





**मुंबई, दि. ३ प्रतिनिधी**

बुधवारी शेअर बाजार वाढीसह बंद झाला आणि सेंसेक्स तसेच निफ्टी ५० हिरव्या निशाणीवर बंद झाले. मेटल सेक्टरमधील कंपन्यांना सर्वाधिक फायदा झाला, ज्यामुळे बेंचमार्क निर्देशांकांनी चांगली कामगिरी केली. सेंसेक्समध्ये ४१० अंकांची वाढ झाली, तर निफ्टी ५० मध्ये १३५ अंकांची तेजी दिसली.

बुधवारी सकाळी सेंसेक्सने ८०,२९५ पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाच्या शेवटी ०.५१ टक्के वाढीसह ८०,५६७ पातळीवर बंद झाला. निफ्टी ५० ने २४,६१६ पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाच्या अखेरीस ०.५५ टक्के तेजीने २४,७१५ पातळीवर बंद झाला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप सेगमेंटने बेंचमार्क निर्देशांकांच्या तुलनेत चांगली कामगिरी केली. बीएसई मिडकॅप निर्देशांकात ०.६३ टक्क्यांची वाढ झाली, तर स्मॉलकॅप निर्देशांकात ०.९० टक्क्यांची तेजी दिसली.

या दरम्यान, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सत्रातील ४५० लाख कोटी रुपयांवरून वाढून सुमारे ४५३ लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसात ३ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक फायदा टाटा स्टीलला झाला, ज्यात तब्बल ६ टक्क्यांची उसळी दिसली. त्यानंतर हिंडाल्कोमध्ये ३.०६ टक्क्यांची तेजी, जेएसडब्ल्यू स्टीलमध्ये २.७१ टक्क्यांची तेजी, कोल इंडियामध्ये २.५६ टक्क्यांची तेजी, इंडसइंड बँकेत २.२५ टक्क्यांची तेजी दिसली.

**सेन्सेक्स 80157**

**निफ्टी 24,579**

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक तोटा इन्फोसिसला झाला, ज्यात १.३१ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर एचडीएफसी लाइफमध्ये ०.८१ टक्क्यांची घसरण, एनटीपीसीमध्ये ०.६१ टक्क्यांची घसरण, विप्रोमध्ये ०.५५ टक्क्यांची घसरण झाली, तर नेस्ले इंडियामध्ये ०.५१ टक्क्यांची तेजी दिसली.

सर्वाधिक फायदा मेटल सेक्टरच्या कंपन्यांना झाला, ज्यामुळे निफ्टी मेटलमध्ये ३.११ टक्क्यांची उसळी दिसली. त्यानंतर निफ्टी इंडिया टुरिझममध्ये १.२९ टक्क्यांची तेजी, निफ्टी कमोडिटीजमध्ये १.१५ टक्क्यांची तेजी, निफ्टी फार्मामध्ये १.१० टक्क्यांची तेजी, निफ्टी पीएसयू बँकेत १.०३ टक्क्यांची तेजी, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये ०.९७ टक्क्यांची तेजी, निफ्टी बँकेत ०.७६ टक्क्यांची तेजी, तर निफ्टी ऑटोमध्ये ०.७४ टक्क्यांची तेजी दिसली.

दरम्यान, अशोक लेलँडने बॅटरी उत्पादन क्षेत्रात मोठे पाऊल उचलले आहे. कंपनीने चीनच्या CALB ग्रुपसोबत एकत्र येऊन भारतात बॅटरी निर्मिती सुरू करण्याची घोषणा केली आहे. या योजनेनुसार, अशोक लेलँड येत्या काही वर्षांत 5,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. सुरुवातीला कंपनी आपल्या स्वतःच्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरी तयार करेल आणि नंतर इतर कंपन्यांसाठी उत्पादन सुरू करेल. यामुळे भारतातील EV क्षेत्रात मोठी प्रगती होण्याची शक्यता आहे.



श्री.गणेश बाळकृष्ण सकपाळ जनाई अपार्टमेंट चिंचपाडा कल्याण पूर्व



नवसाला पावणारा मासा बेलेवाडी चा राजा,



श्री फोर्ट होली चकला स्ट्रीट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांचा फोर्टचा मोरेश्वर

# अबला महिलांसाठीचा 'आशादीप '

**लोकसेवार्थ**

**लोकजागर**

आपल्या समाजात अंग त्या अंगांचे विविध पैलू आपल्याला पाहायला मिळतात.मात्र या पैलूंमध्ये खूप काही गोष्टी दडलेल्या असतात ,त्या कधी आपल्या दृष्टीसही पडत नाहीत.आपल्या याच समाजातील अबला महिलांच्या,मुलींच्या समस्या जे सोडविण्याचे आपल्या परीने काम करतात ते आपल्या याच समाजातील घटक असतात.हे काम मग लोकांच्या सामूहिक प्रयत्नातून असो किंवा एखाद्या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून केले जाते. अशीच महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील 'आशादीप'महिला शासकीय वसतिगृह हि संस्था समाजातील विधवा,कौटुम्बिक हिंसाचाराला बळी पडलेल्या तसेच कुमारी माता,मुली,अनाथ मुलं याना आधार देते.त्यांच्या फक्त समस्या सोडविण्यापुरते हे काम मर्यादित नसून अनेक मुलींचे संसार याच संस्थेच्या प्रयत्नातून थाटले गेले आहेत.

१९८३ साली आशादीप' या संस्थेची स्थापना जळगावात झाली,तर २००६ पासून या संस्थेस आश्रयगृह म्हणून घोषित करण्यात आले.आज येथील महिला आणि मुली स्वबळावर उभ्या राहण्याचे प्रशिक्षण घेत असून यात त्या यशश्वी देखील झालेल्या आहेत. या आश्रयगृहात निराधार,निरश्रीत महिलांना आधार देऊन त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.शासनाच्या अनुदानाने येथील संस्थेचा कारभार चालतो. या आश्रयगृहातील निराधार महिला आणि मुलींना अन्न,वस्त्र आणि निवारा याची मोफत सोय करून देण्यात आलेली आहे.एखादी मुलगी येथे आल्यानंतर तिची २४ तासांच्या आत वैद्यकीय तपासणी पूर्ण केली जाते आणि आवश्यक उपचार करून तिला आश्रयगृहात आधार दिला जातो.महिलांना कायद्याची मोफत मदत देण्यासाठी येथे स्थानिक समिती देखील स्थापन करण्यात आलेली आहे.शहरातील नामांकित वकील आणि सामाजिक कार्यकर्त्या अशा पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी झगडतात. याच माध्यमातून या मुलींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण देण्यात येते.तसेच शहरातील अनेक महिला मंडळ,रोटरी क्लब,इनरव्हील क्लब तसेच विविध सामाजिक संस्थांचे कार्यक्रम देखील या आश्रयगृहात आयोजित केले जातात.या आश्रयगृहातील निरक्षर महिलांना साक्षर करण्यासाठी साक्षरता वर्ग देखील चालवले जातात.महिलांचे कौटुंबिक आयुष्य सुरळीत होण्यासाठी प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांचे समुपदेशन देखील केले जाते.याच आश्रयगृहात महिलांना विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिक मदतीचा मार्ग शोधून दिला जातो आणि आत्मनिर्भर बनवलं जात.एकूणच,समाजातील तमाम निराधार,पीडित महिलांना आधार देणारी आणि त्यांच्या आयुष्यात आशेचा नवा दीप पेटवणारी आशादीप संस्था एक आदर्श संस्था आहे हे नक्की.



# यशोगाथा कुक्कुट पालनाची

**शून्यातून विश्व**

हल्ली उच्च शिक्षण घेऊनही नोकरी मिळवण्यासाठी धडपड करावी लागते. त्यामुळेअनेकजण जे येईल ते काम हाताशी धरून रोजगार करत असतात. तर काहीजण शिक्षण सोडून व्यवसाय करण्याला प्राधान्य देतात. असाच एक अवलियाने शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून डीएड केले. मात्र दहा वर्ष शक्षक भरती न झाल्याने निराश न होता वेगळी वाट धरली. पट्ठ्याने कुक्कुटपालनाचा व्यवसाय करत नवी उभारी घेतली आहे. आज राज्यभरात बेरोजगारांची संख्या कमी नाही .मात्र अनेकजण हताश होऊन टोकाचं पाऊल उचलतात. मात्र काही तरुण तेच पाऊल उचलून नव्या अध्याय उभा करतात. खचून न जाता आयुष्याशी दोन हात केल्यानंतर माणूस यशस्वी होतो. याची अनेक उदाहरणे देखील आपल्यासमोर आढळतात. नोकरी सोडून व्यवसाय केला. नोकरी मिळाली नाही, म्हणून शेती केली. आणि यातून आपली प्रगती साधली. नाशिक जिल्ह्यातील तरुणाने देखील नोकरीच्या प्रतीक्षेत दहा वर्ष घालविल्यानंतर कुक्कुटपालनाकडे वळाला. आणि तेथूनच खऱ्या आयुष्याला सुरवात झाली.

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सापगाव येथील संदीप कचरे या युवकाची ही प्रेरणा गाथा. सर्व तरुणांच्या समोर आदर्श ठेवणारी आहे. साधारण 2012 च्या दरम्यान संदीपने डीएडला ॲडमिशन घेत शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. त्यानंतर दोन वर्ष डीएड पूर्ण केले. मात्र त्यानंतर शिक्षक भरतीची वाट पाहू लागला. एक वर्ष गेलं, दोन वर्ष गेली, अशी जवळपास दहा वर्ष उलटून गेली. आता काहीतरी करावं लागेल. असा निश्चय करून, आत्मनिर्भर होऊन कुक्कुटपालन करण्याचे ठरविले. स्वतःच्या हिमतीवर कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरु केला. कसलेही मार्गदर्शन आणि कसलीही माहिती नसताना त्याने हा व्यवसाय सुरू केला आणि आज चांगल्या पद्धतीने त्याचा हा व्यवसाय सुरु असून तो स्वतःच्या पायावर उभा आहे.आज डीएड होऊन त्याला दहा वर्षे झाली असून मोठ्या शिक्षक भरतीच्या तो प्रतीक्षेत आहे. त्याला नोकरी मिळाली नाही. सरते शेवटी त्याने स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा ठरवलं. साधारण दोन वर्षापासून त्याने स्वतःचा कुक्कुट पालन व्यवसाय सुरू केला असून तो कुटुंबाचे पालन पोषण करेल, इतपत कमावतो आहे. सुशिक्षित बेरोजगारांनी हार न मानता आपल्या ज्ञानाचा, आपल्या कौशल्याचा उपयोग व्यवसायामध्ये दाखवून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे धाडस करावे. आपल्या मदतीला कोणी येणार नाही. आपल्यालाच करायचं आहे. एवढा निश्चय मनाशी ठरवून कामाला लागा असं त्याचे बेरोजगारांना सांगणे आहे.



सुरुवातीला संदीप कचरे या तरुण शेतकऱ्याने 100 कोंबड्यांच्या पिल्लांपासून कुक्कुटपालन व्यवसाय सुरू केला. आजच्या घडीला हा व्यवसाय अडीच ते तीन हजार पक्षांचा बनला आहे. ज्यातून हा शेतकरी महिन्याकाठी चांगले पैसे कमवत आहे. संदीप कचरे म्हणाला कि, कुक्कुटपालनामध्ये सुरुवात 100 कोंबड्या पासून सुरुवात केली. 100 पक्षांच्या शेड साठी 10 हजार खर्च आला. त्यानंतर पक्षी घेण्यासाठी 2500 ते 3000 रूपये खर्च आला. पक्षांच्या खाद्यासाठी 5000 साधारण खर्च लागला. आणि ६ महिन्यानंतर अंडे उत्पादन चालू झाले. 100 कोंबड्या मागे 40-50अंडे रोजचे मिळतात. त्यानुसार आपला रोज चालू होतो. साधारण दिड ते 2 वर्षापर्यंत कोंबडी अंडे देते. असं सर्वसाधारण या व्यवसायाचे स्वरूप असत. आजच्या तरुण बेरोजगारांनी नोकरीच्या मागे न लागता काहीतरी व्यवसाय करणे आवश्यक आहे, मेहनत केल्याशिवाय कुठलीही गोष्ट सध्या होत नाही, त्यामुळे मेहनत करा, यश नक्की मिळेल, असेही तो म्हणाला.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# मंडप कुणाचा? भाजपात पुन्हा ठिणग्या

## मुनगंटीवार विरुद्ध जोरगेवार समर्थक आमने-सामने!

**चंद्रपूर, दि. ३ प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या उत्साहात राजकारणाची ठिणगी पेटली आणि भाजपातील गटबाजी पुन्हा एकदा रस्त्यावर आली. अनंत चतुर्दशीच्या यात्रेत स्वागत मंडप कुणाचा असावा, या किरकोळ कारणावरून मुनगंटीवार आणि जोरगेवार गटातील कार्यकर्ते थेट आमनेसामने आले. वातावरण इतके तंगले की शेवटी पोलिसांनाच मध्यस्थी करावी लागली.

भाजपमधील या अंतर्गत वादाचे बी काही दिवसांपूर्वीच पेरले गेले होते. ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार आणि चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांच्यातील वितुष्ट काही नवीन नाही. विधानसभेच्या निवडणुकीपासूनच दोघांमध्ये शीतयुद्ध सुरू झाले. मुनगंटीवार यांनी जोरगेवार यांचा पक्षप्रवेश आणि उमेदवारीला प्रखर विरोध केला होता. तरीही जोरगेवार यांना तिकीट मिळाले आणि ते मोठ्या मतांनी निवडून आले.

यानंतर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळाला आणि त्यांचे राजकीय वजन कमी होत असल्याचे संकेत दिसू लागले. जिल्ह्यातील बरेचसे नेते व कार्यकर्ते जोरगेवार यांच्या पाठीशी उभे राहिल्याने मुनगंटीवार यांचा एकाकीपणा अधिक ठळक झाला. या पार्श्वभूमीवर साध्या मंडपप्रकरणी झालेला संघर्ष भाजपातील वाढत्या फाटाफुटीची साक्ष देतो.

अनंत चतुर्दशीच्या यात्रेत लोकमान्य टिळक शाळेजवळ स्वागत मंडप उभारण्याचा वाद हे या राजकीय संघर्षाचे ताजे कारण ठरले. मुनगंटीवार समर्थकांनी आधीच मंडप उभारला असतानाच जोरगेवार समर्थकांनी त्यावर आक्षेप घेत स्वतंत्र मंडपाची मागणी केली. काही वेळातच दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते भिडले आणि परिस्थिती चिघळली. शेवटी पोलिसांनी हस्तक्षेप करत वाद शांत केला. भाजप नेत्यांचे मौन मात्र बरेच काही सांगून जाते अशी परिस्थीती आहे कारण चंद्रपूर भाजपातला अंतर्गत स्फोट अजून संपलेला नाही, तर तो दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांना इशारा; शी जीनपिंग यांचे पुतिन आणि किम जोंग उन यांच्या उपस्थितीत जोरदार शक्तीप्रदर्शन

**बीजिंग, दि. ३ वृत्तसंस्था**

अमेरिकेने भारताबरोबरच जगातील अनेक देशांवर टॅरिफ लादले आहे, यामुळे अमेरिकेचे अनेक देशांबरोबरचे संबंध ताणले गेले आहेत. यादरम्यान बीजिंग येथे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि उत्तर कोरियाचे किम जोंग उन यांच्या उपस्थितीत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी जगाला त्यांचे लष्करी सामर्थ्य दाखवून दिले आहे. शी यांनी कोणाच्याही दादागिरीला चीन घाबरत नाही असा थेट संदेश अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दिला .

जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या चीनच्या राष्ट्राध्यक्षांनी यावेळी देशाच्या विकासाबद्दल देखील विधान केले. "चीनचा उदय अटळ आहे," असा स्पष्ट इशारा त्यांनी अमेरिकेला दिला.



बीजिंगच्या तियान आनमन चौकात ५० हजारांहून अधिक लोकांना समुदायाला संबोधित करताना शी जिनपिंग यांनी इशारा दिला की, "आज, मनवजातीसमोर शांतता की युद्ध, चर्चा की संघर्ष, एमेकांचा विजय की झिरो-सम असे पर्याय आहेत." तसेच ते पुढे बोलताना म्हणाले की, आज चीनचे नागरिक हे इतिहासाच्या योग्य बाजूला ठामपणे उभे आहेत.

यावेळी शी जिनपिंग यांनी ओपन-टॉप लिमोझिनमधून सैन्यदल व अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची पाहणी केली, ज्यामध्ये क्षेपणास्त्रे, रणगाडे आणि ड्रोनचा समावेश होता. आकाशात मोठे बॅनर घेतलेले हेलिकॉप्टर्स आणि फायटर जेट्सने उड्डाणे केली.

७० मिनिटे चाललेल्या या सोहळ्याचा शेवट ८० हजार शांततेचे प्रतिक असलेली कबूतरे आणि रंगीबेरंगी फुगे आकाशात सोडून झाला. या सोहळ्याला सुमारे दोन डझन परदेशी नेते देखील उपस्थित होते. डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफच्या मुद्द्यावर अमेरिकेबरोबरचे संबंध ताणले गेले असताना हे देश चीनशी जवळचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# सात वर्षांपासून बेपत्ता पती इन्स्टा रीलमध्ये भलत्याच महिलेसह सापडला

**गाजियाबाद, दि. ३ वृत्तसंस्था**

इन्स्टाग्राम हे तर हल्ली सगळ्यांच्याच आयुष्याचा एक अविभाज्य भाग झालं आहे. मात्र याच इन्स्टाग्राममुळे सात वर्षांपूर्वी बेपत्ता झालेल्या पतीचा एका महिलेला शोध लागला आहे. विशेष बाब म्हणजे तिचा पती दुसऱ्या महिलेसह करुन सुखाने राहतो आहे. पतीचं हे रील पाहून सदर महिला चकीत झाली. तिने तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली. पतीने आपली फसवणूक करुन दुसरा विवाह केल्याची तक्रार या महिलेने केली आहे. उत्तर प्रदेशातल्या हरदोईतलं हे प्रकरण आहे. सात वर्षांपूर्वी आपला पती बेपत्ता झाल्याची तक्रार महिलेने नोंदवली होती.

उत्तर प्रदेशातील मुरारनगर भागात आटमाऊ गाव आहे. या ठिकाणी राहणाऱ्या शीलूचं लग्न २८ एप्रिल २०१७ च्या दिवशी आटमाऊ गावातल्या जितेंद्र कुमार उर्फ बबलूशी झालं होतं. जितेंद्रने सासरच्या मंडळींकडून सोन्याची साखली आणि अंगठी मागितली होती. मात्र त्याची ही मागणी पूर्ण झाली नाही त्यामुळे त्याने शीलूला घरातून हाकलून दिलं. यानंतर या महिलेने हुंड्यासाठी छळ होत असल्याची तक्रार नोंदवली होती. यानंतर काही महिन्यांतच शीलूच्या वडिलांनी जितेंद्र बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली. पोलिसांनी जितेंद्र कुमारचा शोध घेतला. पण त्याचा काही पत्ता लागला नाही. पोलिसांनी अखेर जितेंद्रचा शोध घेण्याचं प्रकरण बंद केलं. शीलूला सात वर्षांनी बेपत्ता झालेला पती इन्स्टाग्राम रिलवर दिसेल असं वाटलंही नव्हतं. ती जेव्हा सहजच इन्स्टाग्राम बघत होती तेव्हा तिला जितेंद्र कुमार आणि दुसऱ्या एका महिलेचा व्हिडीओ दिसला. जितेंद्र लुधियाना येथील एका महिलेसह असून तो तिच्यासह रील बनवत होता हे शीलूला समजलं. यानंतर शीलूने पोलीस ठाणं गाठलं आणि जितेंद्रने दुसरं लग्न केलं आहे आणि आपली फसवणूक केली आहे अशी तक्रार नोंदवली.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**